म. ग्रं. सं. ठाणें

विषय

संग्रहालय क्रमांक

लेखक

पुस्तकाचें नांव

सन

नाटक

# AFSALKANA.

---

# अफझलखानाच्या मृत्युचें नाटक.

---

हें पुस्तक.

## कोंडो सखाराम घांटे,

असि. मास्तर शा. नं. १ ठाणें,

यांणी तयार करून

ठाणे येथें

अरुणोदय छापखान्यांत छापविलें.

---

आवृत्ती १ ली

---

शके १७९३.

सन १८७१.

---

किंमत ८ आणे.

मेहेरबान विष्णु बाळकृष्ण सोहनी,

ठाणें आणि कुलाबा जिल्ह्याचे डेप्युटी ए. इन्स्पेक्टर

यांस,

त्यांची देशकल्याणेच्छा जाणून

कर्त्यानें कृतज्ञतापूर्वक

हें पुतक

नजर केलें आहे.

आज्ञा धारक,

कोंडो सखाराम घाटे.

# प्रस्तावना

सं.नं. ८३० ता. १८-१०-२८

———ooo———

या महाराष्ट्रदेशांतील लोकांच्या सुदैवानें काहीं वर्षां आलिकडे हा देश विद्या व कलाकौशल्य निपुण अशा इंग्लिशांच्या आश्रयांत आल्यामुळें, बहुत दिवस मागें पडल्या असून सांप्रत अनुभवास आल्यानें एतद्देशिय लोकांस उप नव्या अशा भासतात त्या गोष्टींची दिवसें दिवस समृद्धी होत चालली आहे; परंतु ही एक दुर्दैवाची गोष्ट समजली पाहिजे कीं; देश भरभराटीस येण्यास व देशबांधवांस सुखानुभव मिळण्यास कारण जो **स्वदेशाभिमान** त्याचा फैलाव होणें एकीकडे राहून त्याच्या उलट तो सर्वत्रांच्या अंत:करणांतून नष्ट झाला असें म्हटलें तरी चालेल. या विषयीं पुष्कळ उदाहरणें प्रसंगवशात् पाहाण्यांत येतात. आपले पूर्वज देशाच्या कल्याणाकरितां कसे झटत होते व तो त्याचा हेतु सिद्धीस जाण्यास अश्रांत श्रम करून त्यांनी काय काय त्रास सोसले, आणि आपल्या आयुष्याचा कसा सद्व्यय केला या गोष्टींचा विचार प्रत्येकाच्या अंत:करणांत सार्वकाल असणें जरूर आहे.

देशाचा कळवळा बाळगणाऱ्या प्रतापीपुरुषांपैकीं अलिकडील पुरुष जो **शिवाजी** म्हणून भोसल्यांच्या वंशांत होऊन गेला व ज्याणें या देशास व मुख्यत्वें कामधेनुरूपी हिंदु धर्मास व्याघ्ररूपी मुसलमानांच्या जबड्यांतून सोडवून आपल्या अश्रांत श्रमाचें फल जें सुकीर्ति तिचा ध्वज सर्व जगांत फडकत ठेविला, त्याच्यावर आलेल्या दुर्घट प्रसंगांतील एका प्रसंगाचें वर्णन या पुस्तकांत केलें आहे.

या शिवाजीचा जन्म मराठे जातींतील भोसल्यांचे घराण्यांत शहाजी या नावाच्या पुरुषा पासून शके १५४९ म्हणजे सन १६२७ या वर्षी शिवनेर किल्यांत झाला. तो तारुण्यावस्थेंत आल्या पासून, या देशास हिंदुराजा असावा व या देशांतील प्रजांनी सुखोपभोग घ्यावा असें त्यास वाटून तो तत्प्रीत्यर्थ यत्न करूं लागला. त्या प्रसंगी सर्व दक्षिणेंत विजापूरच्या पातषहाचा अंमल होता. शिवाजीनें मावळांतील, स्वभावानें एकमार्गी व शरिरानें सदृढ अशा लोकांच्या टोळया जमवून पातषहाचे राज्यास अपाय करण्याची सुरुवात केली. शके १५८१ म्हणजे सन १६५९ या वर्षाचे सुमारास दक्षिणेंतील बराच मुलूख त्याणें काबीज केला व फौजही पुष्कळ वाढविली. पातषहाच्या तर्फेनें देशाचे संरक्षणार्थ असलेल्या लोकांच्या द्वारें जेव्हां अनेक प्रकारें शिवाजीच्या कागळ्या पातषहाच्या कानावर गेल्या, तेव्हां पासून कोणत्या रीतीनें तरी यास धरून आणून नाहींसा करावा; अशा विषयीं पातषहा अलिअदिलषहा याणें अनेक उपाय केले, परंतु सर्व निर्फल होऊन दिवसें दिवस शिवाजीचें वर्चस्व होत चाललें. शेवटीं निरुपाय होऊन, आपल्या फौजेतील अफझलखान नावाच्या बलाढ्य सरदारास; शिवाजीस जिवंत धरून आणण्यासाठीं पाठविण्याची योजना केली.

वरील सरदारास पाठावण्याचे योजने पासून, शिवाजीच्या हातून त्याचा पराभव होई पर्यंत झालेला इतिहास या पुस्तकांत आहे.

हें पुस्तक. मे० क्या० ग्रांटडफ साहेब यांणी केलेल्या इतिहासा वरून व कांहीं जुन्या माहिती वरून तयार केलें आहे. नवीन पुस्तक करण्याचा हा माझा पहिला प्रसंग आहे:

यास्तव विद्वज्जनांस विनंती करितों कीं, दोषांकडे दुर्लक्ष्य करून गुण ग्रहण करावे व असेंच दुसरें एखादें उपयुक्त पुस्तक करण्यास मला उत्तेजन द्यावें.

या पुस्तकांतील दोष कोणीही मला कळविल्यास त्यांचे आभार मानून दुसऱ्या आवृत्तीचे वेळीं ते निट करीन.

रा. रा. बाळकृष्ण आत्माराम गुप्ते यांणीं, रा. रा. रामचंद्र भिकाजी गुंजीकर, बा. हा. स्कु. चे असि. मास्तर यांच्या मतासह शिवाजी विषयीं कांहीं माहिती पाठविली, यास्तव उभयतां देशकल्याणेच्छुंचें अनेकवार आभार मानितों.

हें पुस्तक तयार करण्याच्या व तत्संबंधी सर्व कामीं, रा. रा. **कृष्णाजी पर्शुरामगोरे** मनोविहार कर्ते यांणीं उत्तम प्रकारें सहाय केल्याबद्दल त्यांचे आभार मानून या पुस्तकाच्या या आवृत्तीची व पुढील निघणाऱ्या सर्व आवृत्तींची मालकी त्यांस मोठ्या संतोषानें दिली आहे.

**कोंडो सखाराम वाटे,**
असि० मास्तर ठाणें.

---

ना.
८८

# अफझलखानाच्या मृत्यूचें नाटक.

प्रारंभ.

## अंक १ ला.

———ooo———

### मंगलाचरण.

( वसंततिलका )

भालीं सुधांशु विलसे गजचर्म आंगीं,
लक्ष्यीं हुताशन हलाहल कंठभागीं ॥
चंद्रप्रभेसम विभूति विलग्नदेहा,
द्रष्टा स्वभक्तप्रिय शंकर इष्ट दे हा ॥१॥

[ पृथ्वी छंद ]

सदाहि सरला गाते स्तवनिं होय जीच्या हरी,
रमूनि रसनाग्नि जी सकल काळजीच्या हरी ॥
स्वदासअवनींपटुत्व कविकालिदासीं दिसे,
तिला स्तवुनि प्रार्थितों ममजडत्व भंगो तसें ॥२॥

( मंदाक्रांता )

राहे देहीं तप करुनियां जो सदा जीवकार्या,
मत्तामायाकुटिल त्यजुनीं भोगिली शांतिभार्या ॥
दावी लोकां सुलभपथ जो नाशि कामादी सांस,
सप्रेमें मीं षडारिभित तो वंदितों रामदास ॥३॥

( मंगलाचरण झाल्यानंतर सूत्रधार येतो. )

**सूत्रधार.**— पुरे हा विस्तार, आतां जगच्चालकाचें स्मरण करून त्याची स्तुति केली पाहिजे.

पृथ्वी छंद.

जगज्जनन, पालन, क्षयहि होय इच्छाबळें,
गमे सकल कल्मष क्षय करील कोपानळें ॥
दिवा निशि प्रकार हे असति शक्तिचे ज्याचिया,
शमादि नव साधुनी स्मर मना पदा त्याचिया ॥ १ ॥

सज्जनांचें पालन, दुष्टांचा संहार आणि सृष्टीचा यथानुक्रम हीं कृत्यें ज्याच्या इच्छेनें होतात तो जगदीश सर्वत्रांचें कल्याण करो. ( पडद्याकडे पाहून ) पारिपार्श्वका, सर्व सिद्धता आहेना? श्री रघुकुल तिलक जो श्री रामचंद्र त्याच्या उत्साहार्थ सर्व गुणिजन समाज एकत्र जमला आहे, तसेंच देशकल्याणेच्छु व देशाभिमानी सूज्ञ जनानीं आज्ञा केल्या प्रमाणें, हिंदुधर्मोच्छेदक यवनांचा पराभव करून, त्रस्त झालेल्या प्रजांस सुखोत्पत्ती देणारा छत्रपती **शिवाजी** महाराज याच्या इतिहासिक कथेचे नाटक करून दाखविणार, याज करितां त्वराकर ! त्वराकर ! !

( इतक्यांत पारिपार्श्वक येतो. )

**पारिपार्श्वक.**— मित्रा सूत्रधारा, सुज्ञजनांच्या आज्ञे प्रमाणें शिवाजी महाराजाच्या इतिहासांतील असा कोणता भाग आहे कीं; ज्यांत वीर, भक्ति, भयानक, करूणा आणि शृंगार हे रस आहेत!

**सूत्रधार.**— मारीषा, स्मरण कर, जनांचें मन रंजन करण्या करितां विद्वान कवि जो **भालचंद्र** त्याणें, विजयापूर स्थित अलीअदिलषहा पातषहा कडून, छत्रपती शिवाजी महाराज यांस धरून नेण्या करितां **अफझल** नावाच्या सरदाराची योजना झाली होती व त्यानें महाराजांस धरून

आणीन अशी प्रतिज्ञाही केली होती, त्या बलाढ्य सरदारास महाराजांनी आपल्या चातुर्यबलानें हतवीर्य करून त्याचा शिरच्छेद केला, या भागाचें नाटक, ज्यांत बहुतेक सर्व रस आहेत असें करून दिलें आहे तें तुला स्मरत नाहीं काय ?

**पारिपा०.**— ( स्मरण केल्याप्रमाणें करून ) हो हो, ध्यानांत आलें, तें नाटक योग्य आहे खरें, जें पाहिल्यानें मनरंजन होणार नाहीं असा एकही मानवी प्राणी नसेल.

**सूत्र०.**— तर मग आतां तयारीस लागावें.

**पारिपा०.**— ( विचारयुक्त होत्साता ) मित्रा, सर्व योग्य आहे, पण तें बहुतेक सर्व उर्दू भाषेंत आहे म्हणून विचारतों, आपल्या पात्रांस ती भाषा अवगत आहेना ?

**सूत्र०.**— हो हो, आहे यांत काय संदेह ! तूं पहाशील कीं, या रंगभूमीवर पात्रें रसभरित कशीं भाषणें करतील तीं ! भाषणें करण्यांत नाटकपात्रें तर प्रवीण आहेतच व त्याणीं उत्तम भाषणें करून सर्व जनांस रंजवावें अशी श्री सरस्वतीची प्रार्थनाही केली आहे. तर त्या विषयीं किंचितही काळजी नको.

**पारिपा०.**— बरें तर हा मी सिद्ध आहें. ( थोडासा पुढें जाऊन मागें येतो. ) सिद्ध आहें असें म्हटलें खरें पण नको, मला आठवण झाली, मला जाऊंद्या, पाहिजे असल्यास तुम्हींच जनांचें मन रंजवा. हो हो! आपलें आपण पाहावें. मित्रा सूत्रधारा, मीं येतों बरें. ( जाऊं लागतो )

**सूत्र०.**— अरे इकडे ये. ( आल्या नंतर ) तूं काय म्हणतास ते मीं समजलों नाहीं. स्पष्ट सांग काय तें.

**पारि०.**— स्पष्ट काय सांगावयाचें, तुमच्या नाटकाच्या

-नादीं लागल्या मुळें सर्व जन " नाटकी विदुषक, नाटकी विदुषक" असें म्हणून नाकें मुरडतात. या साठीं म्हणतों. तुम्ही पाहिजे तें करा, आपली मानमान्यता राहावी हें जर मनांत आहे व जर अन्नाची इच्छा आहे तर " संगत्यक्त्वा सुखीभव " हा मंत्रच जपला पाहिजे. अर्थात आपणापासून दूर राहिलें पाहिजे

सूत्र०.– ( हसून ) शाबास शाबास! " नाटकी विदुषक" असें तला लोक म्हणतात हें लांच्छन आहे असें तुला वाटतें काय? काय समज हा! अरे ऐक, नाटकाचें महत्व पुष्कळ वेळ तुला सांगितलें असेल व आतांही सांगतों पहा, हर कोणत्याही पुरुषाच्या किंवा व्यक्तीचा इतिहास वाचून त्यांच्या सद्गुणा विषयीं किंवा दुर्गुणा विषयीं, शौर्या विषयीं किंवा दुर्बलत्वा विषयीं, औदार्या विषयीं किंवा कृपणते विषयीं किंवा हर कोणत्याही गुणा विषयीं वाचणारांच्या मनांत उत्पन्न झालेली जी बुद्धी तिचें दृढीकरण करण्यास अथवा इतिहासांतील प्रकार प्रत्यक्ष डोळ्यां समूर उभे करून दाखविण्यास सांप्रत कालीं किंवा प्राचीन कालीं नाटका शिवाय दुसरें साधन नाहीं व नव्हतें असें जर आहे तर 'नाटकी' या संबोधना पासून तुला राग यावा काय? छः हा तुझ्या असमजसपणाचा परिणाम होय. एकाद्या महत्वाच्या कामीं जो साह्य करितो तो कधीं तरी निंदेस पात्र होईल ही गोष्ट मनांतही आणू नकोस.

पारि०.– पहा, आतां लागलेंच मन फिरलें. तुमचे सांगण्या प्रमाणे पुनः पुनः मला नाटकी. नाटकाचा कंटाळा येतो आणि केव्हां नाटकाचा योग येईल असेंही वाटतें. बरें असो मी तयार झालों. प्रथमता आतां काय करणार?

**सूत्र**०— आतां अगोदर रंगभूमीवर, मुसलमान लोकांच्या जुलमी अमलांतलि त्रासलेला एक गृहस्थ प्रवेश करील व त्या नंतर विजयापूरच्या पातषहाचा दरबार होईल, यास्तव त्यांत जें न्यूनाधिक्य होईल त्या विषयीं तुझें लक्ष्य असावें. ( असें म्हणून निघून जातो )

**पारि**०— ठीक आहे. [ सभेकडे पाहून आपल्याशीं ] कां? तुं राहिलासना पुनः? बाबा "जिवंत मनुष्याची खोड मेल्या शिवाय जाणार आहे काय" ह्मण आहे 'बाघ्याचा झाला पाग्या त्याचें येळकोट राहीना, दहस्वभाव जाईना' तसें तुझें. असो, आतां आपण त्या समरचे आजूस उभे राहून कोण येथें येतो व काय बोलतो तें ऐकून मग आंत जावें. [ एकीकडे उभा राहतो]

[ इतक्यांत निरुपायी झालेला असा एक ब्राम्हण येतो. ]

**ब्राह्मण**.— ( साशंकित होसाता हात जोडून ) हे जगन्नियंत्या प्रभू ! या देशांतील प्रजांचा पुरातनकालापासून धर्म ह्मटला ह्मणजे वेदोक्त होय, हा असंख्य वर्षें पर्यंत चालत आला असून सांप्रत कालीं या वेदोक्तधर्मानुयायी प्रजांवर असा कांहीं प्रसंग आला आहे कीं, हा प्रसंग जर या प्रमाणें कांहीं दिवस पर्यंत गुजरून राहील तर धर्म दिगांतरास, जाईल इतकेंच नव्हे तर प्रजाही परलोकवासी होतील. हर! हर! ! हे चांडाळ, जुलमी, धर्मभ्रष्ट, शिस्तनष्ट आम्हां प्रजांस कसे त्रास देत आहेत, शंकर, विष्णु, गणपती, देवी, नारायणादि देवतांचीं देवालयें दुष्टांनी भ्रष्ट करून त्यांचा विध्वंस केला आणि तेथें मशीदी बांधल्या, हिंदुधर्माच्या लोकांनी मुसलमानी ( महंमदी ) धर्म स्वीकारावा म्हणून त्यांस सहन करण्यास दुर्धर अशा शिक्षा करीत आहेत आ-

नेक तऱ्हेचे जुलमी असे कर बसवित आहेत, शहरोशहरीं व गावोगांवीं त्यांचे यवनलोक फिरून रयतेस जुलमानें वाटवीत आहेत त्या मुळें संसाराचें भंडावें होत आहे. नारायणा! तूं नेत्र झाकिलेस काय? ही रयतेवर गुजरली ही तुझीच सत्ता काय? हे सर्व अनर्थ मुला मानवतात ना!! "धर्मसंस्थापनार्थायसंभवामियुगेयुगे" हें वाक्य तूं विसरलास वाटतें! असो, तूं सर्व साक्षी, सर्व द्रष्टा आहेस तुला या एका तोंडानें किती सांगूं!! जें तुला योग्य दिसेल तें तूं कर, परंतु पुनः करूणा भाकून सांगतों कीं, त्या नीचांच्या यातना यापुढें आमच्यानें सोसवत नाहीं, देशील तर कृपादृष्टी करून दयाळू व धर्मपाल असा राजा दे आणि नाहीं तर पृथ्वी वरील पंचतत्वांतून कोणत्याही एका तत्वास आज्ञा करून त्या कडून आम्हास नाहींसे करून टाक आणि आपल्या प्रिययवनास घेऊन चिरकाल जगतांत सुखी नांद. (असें बोलून शोकातुर होऊन निघून जातो.)

**पारि०.**– [ आपल्याशीं ] शिव शिव!! ही हिंदु धर्माची स्थितीना! देवा, बिचाऱ्या धर्मभोळ्या लोकांस कष्टानें मिळविलेलें अन्न खाण्यासहि निर्भय जागा नाहींना! असो (जनांस) आता या रंगभूमीवर अलिआदिलषाहाचा आमदरबार होणार, येथून नाटकास प्रारंभ झाला यास्तव श्रोत्यांचें इकडे लक्ष्य असावें अशी विनंती आहे (असें ह्मणून निघून जातो.

## प्रवेश १ ला.

स्थल.– विजापूर [ पातषहाचा आमदरबार. ]

### पात्रें.

अलिआदिलषहा ... ....... विजापूरचा पातषहा.

फत्तेखां आणि हबीबखां } .... ...................... वजीर.

मीरझा अलि चिखलिजखां. } ............ ............ सरदार.

मुनषी ... .... .... ---- .... .... मुनशी.

चोपदार .... .... ... ... .... चोपदार.

अफझलखां .... .. . .... एक मोठा शूर सरदार.

[ पातषहा तख्तावर नैचा पीत दाढीस हात लाऊन विचारांत बसला आहे, वजीर दोन्ही बाजूस उभे आहेत. उजवे कडे सरदार हत्यार बंद हात बांधून आपापल्या जागीं उभे आहेत व डावे कडे कारकून व कचेरींतिल इतर लोक आपापल्या दर्जानें उभे असून पातषहाकडे पाहात आहेत. **मिजाजअल्ला**, **मिजाजमुबारक**, **अलहमदुलिल्ला**, **मिजाजअकदस**, अशी ध्वनी निघत आहे )

**चोपदार.**– निगेह रूबरू, निगेहरखे, निगेह आदाब्बर पातषहा अलिअदिलषहा बाहादूर, आपके षफकातसें आदाबसें, बफज्जले इलाही. खुदाकरे और हुजूरके दुष्मनोंका पायमाल हो जावे.

**पातषहा**– ( सर्वत्रांचे मुजरे घेऊन ) खैरियत.

**हबिबखां**— तकसीर माफ हो, हुझूरके दुष्मन आज फिकरमंद मालूम होते है, खुदा हकमें खैर करे.

**पातषहा**– ( सर्वांस बसावयास सांगून ) देखो भला, काफर दुष्मन सिवाझी फिलहाल बहुत मगरूर हो गया है और अक्सर वहांके सुबेवालोंके अरज हुझूरमे आते है के, आज सिवाझीने फलाना किला लिया, आज सिवाझीने, फलाने फौजकी शिकस्त कियी, आज सिवाझीने फलाना मुल्क अपने तसरूफमें लेलिया. देखो, मै इस बदफैलीसें सबोरोज हैरान हूं, इस कंबख्तके वास्ते हमारी सवारी खुदब. दवलत उनके तरफ तशरीफ लेगये; लेकिन कंबखत रूबरू नहीं हुवा. लूट लाट और छापा डालके हैरान करता है; इस कंबख्तको सजा किस तौरसें पोहोचेगी येही फिकरमें मै फिकरमंद हू. देखो, वोह कमनसीब कितना बे आदब है! सौ फरमान सरकारके तरफसें गये होंगे; लेकिन हाथ बांधके अबतख हाझर न हुवा. इसवास्ते मसलहत क्या करना येह फिकर मेरेपर गालभ है.

**फतेखां**— या इलाहि! सिवाझी अजब कंबख्त है. हुझूर के तरफसे इतने फर्मान जाते है, लेकिन उसकी कमनसीबी उसकु हाझर होनेकु अटकातीहै. खुदावंत, उसके मौतनें उसकु घेर लिया है! उसकी क्या निसाद है! हझूरसें एक गुलामकूं हुकुम हो तो उसको जमीनदोस्त करडारेगा. उस-को सजा देनेके वास्ते गुलाम **अफझलखांकूं** हुकूम हो तो एक लहजेमें उसकी खाक बाकी न रखेगा. उस कम-नसीबके लिये मिझाझ मुबारखपर इतनी फिकर जरूर नहीं.

**पातषहा**– ओहो! अफझलखां वैसा बहादुर है? तो कदी येह खिदमत अफझलखां बजा लावेगा तो उसको बहुत सर्फराज करूंगा.

**हबीबखां**– ( आदाब करून ) पातषहा सलामत, अ-

फझलखांकी क्या गखदूर है ! हुझूरका हाथ मबारक किसी केभी सरपर हो तो अस्माका जमीपर लावेगा या जमीका औंधी कर देवेगा. अफझलखां तो पातषाही फौजमें जवामर्द और तदबीर वाला है.

**पातषहा**— हां, दुरुस्त हुषार मालुम होता है, अलबत्ता खिदमत बजा लावेगा इसमें षक नहीं.

**फत्तेखां**— हुझूरसें कुछ छुपी हुइ बात नहीं, बडेसें छोटे तख और दौलतमंदसें गरीब तख येक येक आदमी हुझूरके नझरमें है, यंहां कुछ अरज करना जरूर नहीं. हुजूरके फरमानेसें मुझकुं मालुम होता है के, वोहि खिदमतपर मुकरर होवेगा और फतहभी पावेगा.

**पातषहा**— मै खुब समजताहुं के, वोहि उसकुं हुजुरमें बांध लावेगा या दोजखकुं पोहोचावेगा, [ हबीबखानाकडे पाहून ] क्यौं? इसबातमें आपनी क्या सल्लाह है ?

**हबीब**— [ आदाब करून ] जो फत्तेखानें हुझूरमें अरज किया सो लायक तारीफका है, और हुझूरसेंभी कुछ बात छुपी हुयी नहीं, हुजूरके दिलपर सब रोषन है.

**पातषहा**— [ चिखलिजखां कडे पाहून ] आपकी क्या सला है ?

**चिखलिज**— गरीबपरवर पातषहा सलामत, जो फत्तेखांने और वजीरे हबीबखांने हुजूरके खिदमतमें अरज किया सो बरहक है. और गुलाम उमेदवार है के, इसीबख्त अफझलखांकु हुजूरमें हाजर करके उस कंबख्तको सजा पोहोचानेका हुकुम हो. गरीबपरवर, मै क्या अरज करू इस कम नसीबन बहुत दगा मचाया हैं और पातषाही मुलकुं कुछ खातरमें नहीं लाता, येही निसानी उसके

मौतकी मालूम होती. एक दफा बाहादूर अफझलखांके हातसें दोजखकुं पोहोंचे तो वो, पातषहाके दुष्मनीसें और लोक उसके जुलूमसें खलास होवेंगे.

**पातषहा**— ( चोपदाराकडे वळून ) कौन हझर है? अफझलखां इसी वख्त हजर होवे.

**चोपदार**— बहोत मुबारख, [ निघून जातो ]

**पातषहा**— क्यौ हबीबखांजी, उस जवानके साथ फौज, हथियार, और सरंजाम भरपूर दिला देना के, जिस्सें उस दुष्मनकुं पकडनेके काममे किसकीभी कमती न पडेगी. क्यौ के, कहा है " भेडियेके षिकारको षेरके षिकारका सरंजाम रखना "

**हबीब०**— सच्च है खुदावंत, और, सरकारका नाम सुनतेही दुष्मनोंका कलेजा फटजाता उस्सी माफक उस गुलामको देखतेही दुष्मन भाग जातें है.

[ इतक्यांत चोपदार व अफझलखां येतात ]

**चोपदार** — अफझलखांके सलामपर निगा किजिये मेहरबान.

**पातषहा**— क्यौ अफझलखांजी, खूष तो हो!

**अफझलखां**— पातषहा सलामत, हूजरके नझरे पर्वरीषसें बंदा हमेषा खुषीमें है, खुदा पातषहाको सलामत रखे और पातषहाके दुष्मनोंका पायमाल करे. पातषहाके सलामतीमें हम सब गरीबोंकी सलामती है.

**पातषहा**— [ अफझलखानास बसावयास सांगून ] फिलहाल आपको कुछ कामके लिये बुलाया है.

अफझल— आज मेरी बडी नेकबखती है के बहोत मुद्दतसें हुजूरमे मेरी याद हुई, और हुजूरके कदम नझर आये

इस जानमें हुझूरके सरफराजीके सिवाह दुसरी कुछ मशेह नहीं. ये दुनियां दुरोझा है. यहां हुझूरकी नझर जिस के उपर मेहरकी हो वो नेकबखत और करडी हो सो कंबखत.

**पातषहा**– [ चिखलिजखानाकडेवळून] सच्च है अफझल खां हुषियार है.

**चिखलिज**– हुझूरपर सब रोषन हैं, अरज करना जरूर नहीं.

**पातषहा**– तुम्हारा जो इरादा था सो आफझलखांकु. जाहिर करो के, उसमे उसकी क्या सला है ?

**चिखलिज**– ( अफझलखानास) अफझलखांजी, तुम्हारी आज बडी नेकबखती के, सरकारकी मेहर आपके उपर कमाल है, देखो, हम सब गुलाम है लेकिन सबोंसे तुमारा नसीब बुलंदीपर है के, जो कमीना सिवाझी उसके सजेके वास्ते आपको फर्माया जाता है और मुकरर है के येह बात तुम्हारेसें हो सकेगी. क्यों के, तुम उस्सकरके बसरा बोगे क्यों के वो कंबख्त सामने होके लढता नहीं.

**अफझलखां**– बसर आनेमें बंदेकी क्या मखदूर है. हजरत, यह तुफैल पातषाही निमकका है और मैं खुब समजतांहूं के हुझूरका हाथ किसीभी गरीबके सरपर हो वो गरचे रंडीभी होवे तो उस जवांमर्द बन जावेगी. फेर गुलामने तो सिपाईके खानदानीमें जनम लिया है. अलबत्ता वोह कं. बख्त नाकको घासते और कानोंकु पकडके पातषाहोंके गुलामोंके पास हझर होवेगा या तो दोजख नसीब करूंगा. फिर गुलामका इरादा फिकरमंद मुबारखके नझदीक आनेका नहीं.

**पातषहा**– तुम्हारे खैरख्वाईसे मैं बहुत खुष हुवा और तुमारे गायभमेभी मैं यह केहताथा के, यह खिदमत अफझलखांके लायक है और सच्च है के, तुम ये खिदमत बजा लावोगे और पातषाही मुसाहिबोंमें तुमभी येक मुसाहब बन जावोगे.

**अफझल**– गरिबपरवर, फतेह करके आनेकी बंदेकी क्या मखदूर है! जो होना सो हुझूरके मुबारखसें होवेगा और खिलअलमें नेकनामीके वास्ते बंदेकु सरफराजभी करेंगे.

**पातषहा**– नेकीकी जो बात हैं सो जलदीसें होना चाहिये, क्यों के, तुमारे केहेनेके माफक दुनियां दुरोझा है, किसकु भरोसा है के, कल अपन रहेंगे, वास्ते खलकु. लाहको इजा देनेवालोंकुं सजा पोहोंचाके नेकी कमावेंगे

**अफसल**.– खुदा बंदे बंद, मैं अभी हझर हूं; के, बंदा बहोत रोजसें उमेदवार था के, कुछ खिदमत पातषाहकी बजाल्यावे और दुनियांमे नेकनामी हासल करे, सो आजका मुबारख रोज है, खाविंदकी खिदमत फर्माया जाती है और बंदा सर्फराज होता है.

**पातषहा**.– [ चिखलीजास ] वहांके सुबेदारोंकूं और सिवाह लोगोंकूं खत लिखके उसमें ऐसा लिखना के, सबो ने उस जवामर्दको दिल जानसें मदत करना के, जिस मदतसे वो कमनसीब अपने हाथ आजावे [ हबीबास ] क्यों! हुकूमके माफक सबी अमलदार और रयत एकदिल होजावे तो उस कंबख्तकू पकडना सेहज और सेहल है, क्योंके, किताबोंमें कहा है “ दुदिलुयक्षवद्धिष्कनदकोहरा ॥ परागंदगीयारदमूहरा” दोदिल एक होवे तो पहाडभी

फोडा जाता है और बहोत चिमठीयसें एक बडा साप खेंचा जाता है, फिर सिवाझीकी क्या बिसाद है!!

हबीबखां–अलहमदुल्लिला, क्या हुझूरकी पोहोंच है और कैसे दानोंकूं हुकूम होता है! अब तो कुछ षक नहीं. सबोने समझना. सिवाझीको जंजीर जडवाके हुझूरमें हजर कियाहि जानो- [आपल्या मनाशीं] अरे कंबख्त, केतने दफे हुझूरसें तुझपर फरमान गये! अखेरिषकों तेरे सिरपर मौत थी वास्ते हझर न हुवा; उसकी अखेरी यह तुझपर पोहोंची. खैर, "जैसा करना वैसा पाना" यहां किसका क्या इलाज है!! (पातषहास आदाब करून) गरीबपरवर, वोह बिचारा मारा जावेगा या हुझूरसें गुन्हा बक्षी हो जावेगी?

पातषहा.–गुलिस्तानमें लिखा है के, किसीने सापपर मेहरबानी या रेहमतकी सो रेहमत नहीं कही जाती; बल्के वो सब आदमीयोंपर जुलूम है, और वोह साप जिसकूं खराब करेगा उसकी बदी रहिमत करनेवालोंके सरपर है.

चिखलीज.–सुब्हानअल्ला, क्या खूब फरमाया बराबर है, सच है के, वैसे कंबख्तोंकूं जान कभी बक्षी नहीं करना.

मिरझा.–अलहमदुल्लिला, लायक हैं के, उसको देखतेही तोफके मोहपर बांधनेका हुकूम हो, या षमसेरसें कत्तल करनेके लिये.

पातषहा.–[हसून] खुदा वैसा करे फेर उसकी तजवीज.

अफझल.–(आदाब करून) इसमें कुछ षक नहीं, हुझूर कदमके तुफैलसें बंदेकी वहां पोहोंचनेकी देरी है, उस कंबख्तकूं हुझूरमें कैद करके लाऊंगा या दोजख पहोचाऊंगा.

पातषहा.–तुम वैसेही जवामर्द हो, वास्ते येह खिद-

मत तुमारे तरफ मुकरर हुई, अब कब जाने चहाते हो?

**अफझल.**–जिसवख्त हुकूम हो इसवख्त बंदेकी तयारी हैं; सिपाई और सवार मौजूद हैं.

**पातषहा.**–बहुत खुब, कल फज्जर जानेकी तयारी रखना. [ हबीबास ] खिलअत मंगाव. (हबीबखां पातषहाचे हातीं पोषाक देतो व पातषहा अफझलखानास देतो. )

**चोपदार.**–निगेह रुबरु, निगेह रखे, निगे आदाबपर अलिअदिलषहा बहादूर. दरबार बरखास्त.

[ पातषहा उठून गेल्यावर. ]

**हबीब.**–कोई हजर है?

**मुनषी.**–जी; बंदा हजर है.

**हबीब.**–हुझूरके फरमानेके माफक रुक्के लिखे होंगे तो इधर लाना.

**मुनषी.**– (पत्रें पुढें करितो) जी हजरत, रुक्के लिखके लाये हैं. अगर मर्जी हो तो दसकतें मुबारख फर्माइये.

**हबीब.**– [ कागदांवर सह्या करून ] बहुत खुब, दप्तरका बंदोबस्त अच्छे तौरसें रखना, ( असें म्हणून निघून जातो. )

[ सर्व निघून जातात. ]

---

## प्रवेश २ रा.

स्थळ– रायगड, ( कचेरी. )

**पात्रें**

**शिवाजी, बाजीफसलकर, खंडेरावकांकडे, नेटाजी पालकर, तानाजीमालुसरे, कृष्णाजीभास्कर वकील मोरोपंतपिंगळे आणि इतर नौकर लोक.**

( नेटाजीपालकर वगैरे कांहीं लोक कचेरींत बसले आहेत इतक्यांत शिवाजी येतो, त्यास पाहून ताजीम घेऊन सर्व आज्ञेनें बसल्यानंतर. )

**मोरोपंत.**— आज सरकाराला येण्याला किंचित उशीर लागला. मी आज्ञे प्रमाणें जावळींतील नौकर लोकांचा तनखा चुकवून त्यांची रवानगी करून दिली आणि उशीर झाला म्हणून लगबगीनें आलों.

**शिवाजी.**— कायहो पंत, विजापुरकरांकडून आलेल्या फौजे पैकीं जे सातशें पठाण आपण नौकरीवर कायम केले व ज्यांच्यावर राघोबल्लाळ यांची नेमणूक केली आहे ते लोक गरिबीनें व एकनिष्ठतेनें वागतात ना? नाहीं तर मुसलमानभाई ते, "तेरे उपर मेरा पाव" असें व्हावयाचें!

**नेटाजी.**— छे छे, सरकार, तसें तर मुळींच नाहीं, जे केव्हां केव्हां माझ्या ताब्यांत येतात त्यांविषयीं मी सांगतों कीं, ते केवळ सरळ असून, त्यांच्या वर्तणुकी वरून असें दिसतें कीं, प्रसंगीं आपले लोक कां कूं करतील; पण ते हटावयाचे नाहींत. जावळी येथील तळांत चंद्र ९ रोजीं रात्रीं मी आपला गुप्त निरोप मोरोपंतांस कळवावया करितां गेलों तो गुप्त रीतीने गेलों होतों. त्या वेळीं त्या पठाण लोकांचीं आपसांत भाषणें चाललीं होतीं त्यां वरून तर माझी त्यांच्या येकनिष्ठते बद्दल खात्री झाली. त्या लोकां पैकीं एक पठाण शेवटीं ह्मणाला "आप कहते हो वो सब सच्च है और मैंभी यह कहता हूं के, खुदाके मेहरबानीसें बिजापूरके सरदारोंका और हमारा जो रूबरू सामना हो जावे तो अपने जानकी आसा छांड, महाराजा सिवाजीके

लिये उसको मारके मर जाऊं " या वरून स्पष्ट होतें. त्यांची शंका सुद्धां घेणें नको असें मला वाटतें.

**शिवाजी.**— तें खरें आहे, विजापुरकरांनी त्यांस नौकरी वरून काढून एकदम दूर केलें असून आपण त्यांस आश्रय दिल्याबद्दल ते आपला आभार मानीत असतील व खचित विश्वासुक असतील असें जरी आहे तरी, जसा आपण मावळ्यांवर विश्वास ठेवितों तशा विश्वासास ते पात्र नाहींत; इतकेंच नव्हे तर, त्यांच्या विषयीं संभाळून राहाणें आपणास जरूर आहे. कसें मोरोपंत?

**मोरोपंत.**— खरें आहे सरकार, किती झाले तरी ते प्रसंगी जातीवरच जातील, या साठीं सावधपणा बरा. खरें कीं नाहीं पालकर?

**नेटाजी.**—हें तर उघड आहे कीं, विश्वासाचें तें स्थानच नव्हे. असो. ( शिवाजीस ) सरकार, आतां पर्जन्यकाळ संपत आला पुढें कोणीकडे जाण्याची आज्ञा? तूर्त विजापूरचा बंदोबस्त अगदीं ढीला आहे व कोकणांत हपशाचेंही तसेंच आहे, तिकडे शामराजपंत गेले होते त्यांचा पराजय झाला आहे, यास्तव तूर्त या दोहोंपैकीं कोणीकडे तरी जाण्याची आज्ञा व्हावी.

**शिवाजी.**— ( हसून मोरोपंतास ) कां पंत, पालकरांस एक ठिकाणीं उगी बसणें तर आवडतच नाहीं. अहो, हे काल साताऱ्याहून आले आणि आज पुनः चढाई करण्यास तयार, (नेटाजीस) अहो पालकर, च्यार दिवस विश्रांती तरी घ्या, मग जावयाचें आहेच.

**नेटाजी.**— नको नको महाराज, या शिवाय कांहीं आज्ञा करा. स्वस्थ बसणें मला मुळींच आवडत नाहीं.

**शिवाजी.**– बरें आहे, मी आतां या विषयींच गोष्ट बोलणार होतों, परंतु आम्हास ईश्वर कसा साह्य आहे! मी बोलणार तों अगोदरच तयारी. ( मोरोपंतास ) मोरोपंत, पाहिलें ना! वाडीचा सावंत कसा बे भरवशाचा तो, प्रथम विजापुरीचा कमजोर पाहून आम्हांस मिळाला व देशमुखीचा हक्क सोडवून घेऊन त्या पैकीं एक चतुर्थांश आम्हांस द्यावा व त्या बद्दल आम्ही त्याचें संरक्षण करावें असें ठरलें असून हाल्लीं तो पुनः विजापूरकरांस मिळाला.

**बाजीफसलकर.**– सरकार, मघां जशीं पालकरांनीं दोघांचीं नावें घेतलीं त्यांतीलच हा तिसरा आहे, सांवता कडून बोलणें करावयास जेव्हां वकील आला त्या वेळच्या बोलण्याची सर्वत्रांस आठवण असेलच, त्या प्रसंगीं, काय गरीबी! काय मित्रत्व दर्शविलें होतें! ! सरकार, हे सांवत वडवाघुळा प्रमाणें आहेत बरें!

**शिवाजी.**– हो खरें, तिघेही दंड करण्यास योग्य आहेत, या तिघांविषयीं लवकरच विचार केला पाहिजे. [ खंडेरावास ] कां खंडेराव, तुम्हांकडून होकार आहे ना!

**खंडेराव.**– होय महाराज, हा पर्जन्यकाल जरीं आहे, तरी दारू गोळा इतका तयार आहे कीं, प्रत्यहीं लढाई चालल्यास एक वर्ष पर्यंत पुरेल. मला असें वाटतें कीं, तें काम आतां तर्त बंद ठेऊन ह्या एक दोन मोहिमा आटोपल्यावर पाहिजे तर पुनः सुरू करतां येईल, मग महाराज आज्ञा करितील तसें.

**शिवाजी.**– तुम्ही ह्मणता इतकी तयारी असेल तर तूर्त तें काम तकूब ठेऊन तयार दारू गोळ्या पैकीं निमे प्रतापगडीं व निमें येथें असा ठेवावा ह्मणजे अडचण पडणार नाहीं.

**खंडेराव.**– ठीक आहे सरकार, आज्ञे प्रमाणें व्यवस्था करितों. ( इतकें बोलत आहेत तों हैबती नावाचा हेर येतो.)

**हैबती.**– राम राम सरकार,

**शिवाजी.**– कां हैबतराव, काय खबर आहे? कांहीं धांदल दिसते आहे!

**हैबती.**– सरकार, वार्ता त लई दुबाडवाणी हगे, पन बगा म्हाराज, कोनीबी घाबराया नग. इकत बरतमान हये कीं, आपनासनी धरून न्हेन्याला इजापूरच्या नोड्यानं धाडलिया योक अफझलखान म्हगून सरदार आन त्याच्या संग, पाच हजार घोडेसवार, सातहजार पायदळ, शंभर तोफा, पाचसे जंजाल न लई बाण इक्ती तयारी दिली हाये बगा आन त्यो उद्याला वांई पाशीं तळ देनार हाये माहाराज. मी विजापुरासन काल रातच्या वक्ताला निगालों सरकार.

**शिवाजी** (नेटाजीस) कां पालकर, आपणास विचार पडला होता कीं, आतां कोणीकडे चढाई करून जावें म्हणून, न तों इतक्यांत विघ्न आलें पहा. (विचारांत पडतो. )

**नेटाजी.**– हें विघ्न कशाचें महाराज, असा यःकश्चित सरदार चढाई करून आला म्हणून आम्हीं भिऊं कीं काय! आमची सर्व तयारी आहे, आज्ञा होत असेल तर, जों पर्यंत तो वांईस येऊन पोंचला नाहीं तों पर्यंत वाटेंतच त्याच्या फौजेची कत्तल करून येतों आणि त्या नोड्याला धरून जिवंत आणितों.

**बाजीफसलकर.**– खरेंच सरकार, यांत तिळभर संशय नाहीं! फौज, दारूगोळा किंवा हरकोणत्याही युद्धसामग्रींत तिळभरही उणें नाहीं, मग आज्ञा होईल तसें.

**तानाजी.**– काय व पालकर, मी सरकारच्या पायाच्या –

चाकराचा चाकर हायें, पन म्हगता, वर महाराज हुकूम करतील तर कांहिंबी ढोंग करूनशानि [illegible] त्याच्या तळांत न आणिन त्या नोड्याची मुंडिकापुन बगा. इवल्या ल्हानशा कामाची चिंता नग कराया.

**शिवाजी.**– मोरोपंत, आपली सरदारमंडळी म्हणते हें सर्व खरें आहे, पण आपण फौजेनिशीं जर आज त्याच्यावर वाईस चढाव करून गेलों तर, ज्या जागीं तो उतरणार तें ठिकाण फार कठीण आहे. रात्रींचा तेथें आपला निभाव लागणार नाहीं, यास्तव मला वाटतें कीं, तुर्त सर्व तयारी मात्र ठेवावी, आणि त्याणें तळ दिल्याची बातमी कळल्यावर त्याजकडे वकील पाठवून गरीबीचें बोलणें चालवावें आणि त्यांत भेट घेण्याची इच्छा दाखवावी, त्यावर तो काय म्हणतो तें ऐकून मग विचार करावा. साम दामानें निभावल्यास नीटच आहे, नाहींतर आपली तयारी आहेच. ( पालकरांस ) कसें पालकर?

**नेटाजी** – ठीक आहे, ही योग्य युक्ती आहे, दोन्हींही कडून तयारी असावी, प्रसंग येईल त्या प्रमाणें करतां येईल पण आजपासून प्रतापगडीं जाऊन रहावें हें बरें वाटतें.

**शिवाजी.**– हें मात्र खरें, सर्वत्रांनीं प्रतापगडीं रहावें व आपल्या आपल्या ताब्यांतील फौजेस गुप्त बातमी देऊन ठेवावी म्हणजे सर्व सावध राहातील.

( इतक्यांत दौलता नावाचा दुसरा हेर येतो )

**दौलता** – महाराज, आफझलखान आज संध्याकाळीं वाईस येणार.

**शिवाजी.**–( सरदारांस ) आतांच त्याकडे वकील पाठवावा म्हणजे तो येऊन पोंचतो तोंच रामरामी होईल.

(सर्वांचा होकार पडल्यावर कृष्णाजीपंतास ) अहो वकील सर्व हकिकत आपणास माहीत आहेच, यास्तव संरक्षणा करितां कांहीं लोक बरोबर घेऊन वाईस निघून जावें आणि अतिशय गरीबीचें बोलणें बोलून त्यावर तो काय म्हणतो तें ऐकून घ्यावें. तुम्हांस याहून ज्यास्त सांगण्यास नकोच.

**कृष्णाजी.**— ठीक आहे सरकार.

(वकील निघून जातो. व सर्व लोक प्रतापगडीं जाण्यास निघून जातात.)

---

## प्रवेश ३ रा.

स्थळ— वाई (तळांतील कचेरी)

**पात्रें.**

**अफझलखान, सैयदहुसेन, जाफरखान, गोपिनाथपंत; हुजऱ्या, कृष्णाजी भास्कर वकील.**

(अफझलखान लोडाशीं बसून नैचा पीत दोघां सरदारांशीं बोलतो)

**सैयद.**—हजरत, खुदाके मेहेरसें सरदार और फौज यहां तख आ पहुंची. आगे क्या हुकूम होता है.

**अफझलखान.**— [निःकाळजीपणानें जांभया देत] काहेका हुकूम? सुनो सैयद, अपने पातषहाके दरबारमें उस कंबख्त सिवाझीकी बडी दिमाख है और हुजूर अपने दिलमें समझते है के, सिवाझी बडा जोरावर है और अकलमंद है; लेकिन मै अपने दिलमें ऐसा समझताहूं के, उसकूं पकडना बहुत सेहेल है. जब चाहे तब जाके पकड ले आना. उसके लिये कुछ धास्ती करनेकी जरूर नहीं.

**जाफर**—मेहरबान, आप कहते हो ये सब सच्च है क्योंके, अपनी ताकत वैसीही है, लेकिन मै ऐसा सुनाहै के, हुजूरसें जिस पठानके पटालनकूं रजा मिली उसमेंसें सात सौं ज्वानकूं कमनसीबनें अपनेपास रखें हैं, सिवाह ये मुल्कमें उसका नाम मषहूरहै. हम अजाने लोग, न मुल्ककी तौर मालूम या न मकानकी खबर, उनका कब्जाअ बोहोत कठिन हैं, इसलिये मै अरज करताहूं के, कुचभी मसल्हत ऐसी मुकरर करना के, जिस्सें वो निमकहराम झट अपने हाथ आ जावे.

**अफझल**.—सच्च है, जाफरखां, तुम्हारा केहना दुरुस्त मालुम होता, तुम्हारे कहामाफक ये मुल्क है और सातसौं ज्वान पठान उनकेपास, सिवाह मरेठोंकी पटालना बहुतहै उस पठानोंकी पटालन ऐसी जोराबर है के, जो कभी उसमेंके सौं जवान हमारे हजार जवानोंपर आवेगे तो अपना इलाज न चलेगा और हमकूं यहासें भागना जरूर पडेगा, सिवाह हुजूरमुबारखके आगे मेंने कहा है के, सिवझीकूं पकडकर जो हुजूरमें न लाऊं या दोजखकू न पोहोचाऊं तो मुं नदिखाऊं. वास्ते बडे तजबीजसें उसकू ताबेमें लेना.

(इतक्यांत हुजऱ्या येतो.)

**हुजऱ्या**.— मरेठोंके तरफसें कोई वकील आया है और अंदर आनेके वास्ते अरज है.

**अफझल**.— क्यों सय्यदखांजी, कमनसीबनें वकीलकूं भेजदिया है, उसकूं अंदर लेनेमें क्या हरकत है? मुझे मालूम होता है के, अंदर आवे तो कुछ हरकत नहीं. आपने लष्करके आजू बाजू बंदोबस्त रखना और उस वकीलकूं अकेला अंदर बुलाना.

**सय्यद.**–कुछ फिकर नहीं, वो आवे और उधरका संदेसा कहे तो दुष्मनकी ताकत खबर हो जावेगी.

**अफझल.**– [ हुजऱ्यास ] उसकुं जाके केहना के, तेरे पास कोई हत्यारबंद होवे तो उसकुं वाहांहि रखके तं अंदर आव. ( हुजऱ्या जातो. )

**जाफर.**– सरकार, वो वकील सिवाझीके तरफसें माफ मंगनेके वास्ते आया होगा, इस वास्तें उसके साथ बडी मीठी बात करनाके जिस्सें उसका दिल खुषी हो जावे और अपने हात मिलजावे.

( इतक्यांत शिवाजीचा वकील कृष्णाजी भास्कर येतो. )

**कृष्णाजी.**– [ सलाम करून ] मी, मराठे राजे शिवाजी महाराज्यांकडून आलों आहें.

**अफझल.**– ( बसावयास सांगून. ) क्यौं पंडत, आप वकील हो ?

**कृष्णाजी**– हां सरकार, आपणापाशीं विनंती करण्या करितां त्याणीं मला आपणाकडे पाठविलें आहे.

**अफझल.**– आजि वकील, सिवाझी एतना मगरूर है ? मेरे आनेकी खबर लगगई तोभी हाथ बांधके न आया और तुमकुं भेजदिया आं ! ! पातषहाके मुल्कमें दंगा मचाके हुझूरका हुकूम दिलपर न लेता ! अपने दिलमें हम जोरावर हों वैसा समझता है, लेकिन पहाडमें चोरोंके मुवाफक ढूंढके लूट, लाट और छापा डालके लोगोंकी नुकसानी करना उससें राजा नहीं बनता. और तुम कहेते हो के, राजा शिवाझी महाराजक तरफसें मैं आया हूं ! ! लेकिन ये अफझलखान है ! जिस गुलामकी पातषहा अलिआदिल बडी आदब रखता ऐसे सरदारकुं मिलना शिवाझीकूं बूरा लगा ! ! क्यौं ? जबाब क्यौं न देते हो ?

**कृष्णाजी.**–खान साहेब. शिवाजी महाराज जाणून बुजून किंवा मानीस्वभावानें आपल्या भेटीस न आले असें नाहीं, आपलें शौर्य, दरारा व कीर्ती सर्वत्र प्रसिद्ध आहे. मी आपणास खरेंच सांगतों कीं, आपण येथें आल्याचें वर्तमान महाराजांस कळल्यापासून भीतीनें चिंताग्रस्त झाले असून अन्नपाणी वर्ज केलें आहे सरदार, आणि अभय मागण्याकरितां मला पाठविलें आहे. त्यांणीं जी आपणापाशीं विनंती करण्यास सांगीतली आहे ती आज्ञा झाल्यास विदित करीन.

**अफझल**–( हसून सैयदास ) क्यौं सय्यद, पंडत क्या कहता है? बोले, हम यहा आया ये सुनके शिवाझीने डरके मारे खाना पीना छोड दिया.

**सैयद.**– सच्च है सरदार, ये कमताकत मरेठेलोग. कहा हैः– षेरके आगे बकरीकी दिमाख क्या है? उस माफक अपना नाम सुनतेहि उसका कलेजा फट गया है इसमें षक नहीं.

**अफझल.**– अजि वकील, दुष्मनने क्या कहा है?

**कृणाजी.**– महाराजांचें असें म्हणणें आहे कीं, आपणा सारख्या बलाढ्य पुरुषाशीं लढाई करून मी यःकश्चित पुरुष जय संपादन करीन हें कधींही घडणार नाहीं, यास्तव आपण दयाळू होऊन अभय द्यावें आणि आजपर्यंत मी केलेल्या अपराधांची पातषहाकडून क्षमा करवावी. मी आजपर्यंत काबीज केलेला मुलूख आपणास देतों आणि असें झाल्यावर मग तुमचा म्हणून कुठें तरी आयुष्याचे दिवस काढीन. यास्तव दयाळू होऊन या विनंतीचा अंगिकार करावा, आणि अभय वचन द्यावें.

अफझल.– [ थोडासा स्तब्ध हूगन नंतर ] अच्छा, जो सिवाझी लाचार होके अरज करता होगा तो देखनेमें आवेगा. अब आप सिवाझीके तरफ जाके उसकूं कहना के, हमारे दिलका इरादा तुझे खबर करनेके लिये अपना वकील भेज देताहूं.

कृष्णाजी.– ठीक आहे मी रजा घेतो. [ असे म्हणून निघून जातो.]

अफझल.–क्यौं सैयद, अपनेपर खुदाकी रेहम नझर है, बिना तसदी लिये अपनी मसलहत बनती है. सुनो सय्यद, जो इसवख्त सिवाझीका कहेना हम न कबूल करूं तो अपना काम न बनेगा, क्यौं के, ये वांई सुबेका काम थोडे दिनके पीछे मेरे हाथमें था, तबसें मुझे खबर है के, ये मुल्क अपने हाथ आनेकी बडी मुष्कल है. इसलिये सिवाझीका कहेना सुनके कबूल करना इसमें आपकूं ये सब मुल्क मिलजावें और हम एक पातषहा बन जाऊंगा.

जाफर.–सरकार, ये सिवाझी बडा कापर है और अकलमंद है. कहेगा एक और करेगा दुसरा, इसवास्ते कुछभी करोगे सो बिचार सें करना.

अफझल.– [ सैयदास ] क्यौं सैयद, मेरी ताकत जाफरखां अब तख न जानता, बिजापूरसरकारमें अकलमंद जवामर्दमें मेरी बरोबरी करनेकूं कोई न सकता. मैं अभि ऐसा इरादा किया है के, गोपिनाथपंडतकूं सिवाझीके तरफ भेज देना. और खबर करना के, तूं जो कहा माफक मुल्क हमारे ताबेमें देवोगे तो तेरे वास्ते पातषहाके पा[illegible] माफीका मैं अरज करके बडा या छोटा मुल्क तुझे दिला दूंगा. क्यौ ?

**सय्यद.**—बहोत खुब, ये सरकारका केहना बहोत अच्छा मालूम होता

**अफझल.**— ( गोपिनाथपंतास ) गोपिनाथपंडत, अभी मै कहा उसमाफक, सिवाझिके तरफ जाके उसकूं केहना और वो क्या कहता है वो सुनके मुझे खबर करना.

**गोपिनाथ.**— बहुत मुबारक, अबि हम रजा लेताडुं

( असें म्हणून पारगांवास येण्याकरितां निघतो. )

---

प्रवेश ४ था.

स्थल— प्रतापगड. ( कचेरी )

पात्रें.

**शिवाजी, मोरोपंतपिंगळे, नेताजीपालकर, तानाजी, बाजीफसलकर व इतर नौकर वगैरे**

( शिवाजी वगैरे सर्व कचेरींत बोलत बसले आहेत. )

**शिवाजी.**— [ नेटाजीस ] तुम्ही म्हणत होतां कीं, फौजेसह जाऊन अफझलखानाचे तळावर छापा घालावा आणि त्यास कैद करून आणावें, परन्तु तें कठिण होतें; कारण तो सरदार बलाढ्य, दारु गोळ्याची भरपूर तयारी, रात्रीचा प्रसंग यास्तव आपण जी योजना केली आहे ती उत्तम असें मला वाटतें, कारण "जो जो नीचा हो चले तों तो ऊंचा होय" गरीबी दाखऊन मतलब साधावा हें सर्वोत्तम. कसें मोरोपंत?

**मोरोपंत.**— सरकारचें म्हणणें खरें आहे, परंतु जरी आपण त्याच्या फौजेवर चढाई करून जातों तरी अपयश येतें असें नाही. जगदंबेचे कृपेनें आपणापाशीं जी तयारी

आहे तिचा शतांशही विजापुरीं नसेल. तर्तची योजनाही उत्तम आहे. दोहों पैकीं जें साधेल तें साधों!

**नेताजी.**— बरें, झालें तें उत्तमच आहे; परंतु अद्याप कृष्णाजीपंत कां परत येत नाहींत. माझ्या मनाला उगाच हुर हुर लागली आहे. न जाणो, ते अविचारी मुसलमान! प्रसंगी वकिलासही बक्षीस मिळावयाचें! मी आपणा कडून सावधपणा केला आहे तो हा कीं, पन्नास निवडक शिपाया सह खंडेराव यांची वकिलाच्या संरक्षणार्थ योजना केली आहे.

**शिवाजी.**— शाबास पालकर शाबास! तुम्हासारखे धूर्त व पराक्रमी गृहस्थ मजजवळ आहेत या मुळें मी कृतकृत्य आहे.

[ इतक्यांत कृष्णाजीपंत वकिल येतो. ]

**शिवाजी.**— या वकील, कसा काय अफझलखाना कडील समाचार?

**कृष्णाजी.**—( नमन करून ) सरकार, आहे तो सर्व बराच आहे. आज्ञे प्रमाणें त्याकडे जाऊन दीनतेचें बोलणें बोललों, त्यांत अतिशय भितरेपणा दार्शित करून "आम्हांस जर आपण पदरांत घ्याल तरच आमचा बचाव आहे" असें ही सांगीतलें. त्या नंतर त्याचें व बरोबरील सरदारांचें बोलणें होऊन, आमचे कडील बोलणें बोलावया करितां गोपिनाथपंत नावाचा वकील उद्यां पाठवितों असें सांगून माझी रवानगी केली, तो वकील आज सायंकाळीं तेथून निघून उद्यां सायंकाळीं पारगांवास येईल व परवां प्रातःकाळीं अफझलखानही फौजे सुद्धां पारगांवीं येईल.

**शिवाजी.**— ठीक आहे, वकील येणार हें उत्तमच आहे, परंतु तुम्ही तेथून सर्व प्रकार प्रत्यक्ष पाहून आलां आहां त्या वरून त्या मुसलमानांची धूर्तता वगैरे कशी काय पाहिली?

कृष्णाजी.— सरकार, कशाची धुर्तता आणि कशाचें काय गलेलठ ते. आत्मस्तुति करितां करितां मरावयाचे. एकानें बोलावें आणि बाकीच्यानीं "सच्च है खुदावंत" असें म्हणून मिशांवर हातफिरवून माना डोलवाव्या. राजरिति किंवा मनुष्यपणा त्यांच्यांत वसत नाहीं म्हटलें तरि चालेल.

शि०.— बरें सर्व ठिक आहे, ( बाजीफसलकर यांस ) आपण व तानाजी वगैरेनी येथील बंदोबस्त राखावा. मी. नेटाजी खंडेराव व इतर कांहीं लोकांस बरोबर घेऊन पारगांवांस जातों, तेथें कचेरि करून वकिलाची भेट घेऊं

[ असें म्हणून मडंळीसह शिवाजी पारगांवास जातो. ]

---

## प्रवेश ९ वा.

स्थल— प्रतापगड (शिवाजीचा महाल)

पात्रें.

**सईबाई [शिवाजीची स्त्री] चिमा, चंद्रभागा आणि यमनी( या तिघी दासी.)**

( चिमा व यमनी या दोघी लुगड्यांच्या घड्या घालीत असून एकमेकींशीं बोलतात )

**चिमा.**—यमने; जा जिन्यापशीं आणि बाईसाहेब येतात आहेत कीं काय तें पहा.

**यमनी.**— [ पाहून येऊन ] छे कुणी येत नाहीं, अझून येण्याची वेळ कुठें झाली आहे !

**चिमा.**— यमने, पोरी ऐकतेस; आम्हीं जातीच्या बटकी, जन्मभर चाकरी करावयाची आणि पोटाला खायचं म्हणून आम्हांस सूख नाहीं! बाईसाहेब श्रीमान, आमच्या सारख्या

शेंकडों बटकींच्या अन्नदात्या, कोणत्याही गोष्टीला वाण नाही. म्हणून त्यांस सूख नाहीं. मिळून पृथ्वींत कुणी सुखी नाहीं इतकें खरें.

**यमनी** —असं कां म्हणतां, बाईसाहिबांनाका सुख नाहीं? सूख असून जर त्याला दुःख मानलें तर मग काय उपाय! पण पाहूं गेलें असतां मला वाटतेंकीं, आपल्या बाईसाहिबांला दुःखाचं कसं तं नाव सुद्धां माहीत नसेल. मला बाई त्याचा आनंद आहे हे! न देवानं असच ठेवावं. यांचे एकाचे एकवीस व्हावे न त्यांच्या पदरीं आमच्या सारख्यांचा शेर असावा.

**चिमा**.—अग, तूं म्हणतेस तं खरं, पण बाई तं ज्याचं त्याला माहीत आपण म्हणतों राजा सुखी, पण ती आमची समजूत खोटी आहे, आमचं मेलं काय? सकाळीं उठं म्हणजे हिकुडलं तिकुडलं कांहीं काम करावं न दिवस गात्र "बयासाहेब, ताईसाहेब" म्हणून पाठीमागून फिरावं न मर्जी संपादावी हेंच काय तें काम, पण थोरांचं कसं, त्यांना अन्नाची, पैशाची, हाताखालच्या चाकरमाणसांची काळजी करावी लागते. राजाला तर विचारूच नको! आज काय, अमूक राजा आला चढाई करून! उद्यां काय, आलं धरणं लपा घोड्याच्या लिदींत! कसं तरी कर न राख आपला जीव. सर्व रात्र दिवस चिंता कशी मनाशीं बांधलेली जशी. यमने, आतां बाईसाहेब सुखी कीं, आम्ही सुखी? बया, थोरांचं थोरांना. आपण उगीच राहावं न दिवस काढावे

**यमनी**.—अहो, तुम्हीं म्हणता हं सर्व खरं, पण सदाकाळ का कुठे असा प्रसंग येतो, येखादवेळ येतो तेव्हां मात्र अंमळ काळजी; पण एरवीं सदाचं सुख कोणी नेलं आहे!

**चिमा**.—पोरी, तुला माहीत नाहीं, मी सांगते, आपल्या

महाराजांना काय न बाईसाहेबांना काय रात्रीची स्वस्थपणीं झोंपसुद्धां नाहीं हो ! खरं म्हटलं म्हणजे हा मदनासारखा पुरुष न ही नागीणीसारखी बायको, सर्व सुखें अनुकूल, यांणी कशी सर्व रात्र सुखांत न आनंदांत काढावी. यमने, अग तूं आतांशी आलीस म्हणून तुला माहीत नाहीं, पण सांगते. या दोघांची प्रीति जर म्हणशील तर पोरी तिला कुठें उपमाच नाहीं! पोथींत सांगितलं आहे कीं, राधाकृष्ण यांचो एकमेकांवर अतिशय प्रीति होती म्हणून, पण यांची पाहून मला ती कांहींच नाहीं असं वाटत. अग, सांगतें ऐक. माझ्या देखत तर तीं कांहीं थट्टामस्करी करणार नाहींना ! तरी बाई तं एकमेकांकडे वांकड्या दृष्टीनं पहाणें, मागून हसणें, एकमेकांच्या अंगावर फुलांचे हार फेकणें हा प्रकार पाहून मनाला कसा आनंद होतो! फार काय सांगूं, आपल्या बाईसाहेबांना जरा महाराजांचे दर्शन न झालं तर ती बायको वेडावल्या सारखी होते न तिचं कुणीकडेही मन लागत नाहीं. ( उसासा टाकून ] अंबाबाई, आलेलं विघ्न तू टाळ म्हणजे झालं ?

**यमनी.**— बाई, कशाचं विघ्न हो? मला सांगा.

**चिमा.**— छे, कांहीं नाहीं उगीच म्हटलं.

( इतक्यांत शिवाजीची स्त्री सईबाई महालांत येते )

**सई.**— ( पलंगापाशीं उभी राहून ) चिमा. चौकांत सासुबाई तुळशीस पाणी घालित आहेत, त्यांच्या जवळ चंद्रभागा उभी आहे तिथं तूं जा ने तिला इकडे पाठवून दे.

**चिमा.**— बाईसाहेब. ( यमनीकडे बोट दाखवून ) ही पोर महालाकडे आजच आली आहे, हिला येथची माहिती नाहीं म्हणून विनंती करितें कीं, तिला संभाळून घ्या.

**सई.**— आजपर्यंत सासुबाई पाशीं ही होती ना ? मला ठाऊक आहे. सासुबाई ते दिवशीं मजपाशीं बोलत होत्या कीं, यमनी पोरगी नवीन चाकरीवर आली आहे ती चपळ आहे म्हणून. मला चपळ मनुष्य जीवाभावानं आवडतं नाहींतर तूं! कांहीं सांगीतलं कीं, सहा महिन्यांची मोहीम आणि सांगावं तेव्हढं.

**चिमा.**— मी ह्मणतें मी आळशी, एक मागीं, पण बडला पाशीं अकरा वर्षे न या पायांपाशीं आज पांच वर्षे काढलीं. आतां काय माझं, मी म्हातारी, जसा आजपर्यंत मला संभाळून घेऊन माझा प्रतिपाल केला तसा हिचा करा इतकंच सांगतें. [ असें म्हणून चौकांत जाते. ]

**सई.**— ( यमनीस ) मुली, तुझें नांव यमनी ना ?

**यमनी.**— जी, होय बायसाहेब. काय हुकूम?

**सई.**— हुकूम कशाचा,कांहीं नाहीं, हुकूम न बिकूम मजकडे कांहीं नाहीं. मजपाशीं मनुष्यें असतील त्यांस तीं माझ्या कुटुंबातील आहेत असें मीं गणतें.

**यमनी.**— मी चुकून बोललें बाईसाहेब, मजवर राग भरूं नये, मी नवशिकी आहें.

**सई.**— अग, राग कशाचा. तुं " काय हुकूम " म्हटलंस यांत कांहीं अन्याय नाहीं, सर्वांची ही रीतच आहे, पण माझा स्वभाव मी सांगितला. [ तिला जवळ बोलावून ] यमने तूं त्या समूरच्या संदुकीतली तसबीर वळखून आणशील का?

**यमनी.**— होय बाईसाहेब, पण ती कुणाची आणूं?

**सई.**— हा वेडे, आणखीं कुणाचीं.

**यमनी.**— महाराजांची होय? ती मला माहित नाहीं, तरी आपण सांगत असाल तर अजमासानं आणतें.

**सई.**—जा तर आण, पण संभाळहो! त्या एकमेकीला लागून फुटतील!

[यमनी तसवीर घेऊन येते.]

**सई.**—[हातांत तसवीर घेऊन न्याहाळून पाहून] ईश्वरा, धन्यमी! धन्यमी!! मजवर तुझे अगणित उपकार आहेत. मला त्वां अशा सुखांत ठेवलेंस कीं, माझ्या सुखाशीं तुलना करण्यास जगांत कोणीही स्त्री नसेल. स्त्रियांस मुख्य जें पतिसुख तें तर मजसारखें कुणालाही नाहीं. माझ्या माहेरच्या निंबाळकरांचा वंश धन्य आहे. त्या घराण्यांत खंडो-गणती पोरी आहेत, पण माझ्याशीं बरोबरी करूं शकेल अशी त्यांत एकही नाहीं. (यमनीस) अग, ही कुणाची तसवीर आणलीस?

**यमनी.**—बाई साहेब, ही महाराजांचीच तसवीर आहे यांत संशय नाहीं.

**सई.**—हें तूं कशावरून वळखितेस?

**यमनी.**—मी गरीबाची पोर, मला मोठ्या लोकांच्या स्त्रियांचा परिचय नाहीं व राजोपचार किंवा तारतम्य नाहीं, तरी तसबीर हातीं दिल्याबरोबर जी आपली मुखश्री पाहिली त्यावरून मी खात्रीनें सांगतें.

(इतक्यांत चिमा व चंद्रभागा येतात.)

**चंद्रभागा.**—ताई साहेब, हें काय? आज जेवण नाहींका व्हायचं? आई साहेब आपली वाट पाहातातना.

**सई.**—अग, अजून येणें कुठे झालं आहे! माझा चातुर्मासाचा नेम नाहींका तुला ठाऊक.

**चंद्र.**—हो खरंच, महाराजांच्या पायांचं तीर्थ घेतल्या शिवाय जेवायचं नाहीं. आज महाराज गेले आहेत तरी कुठे?

**सई**.–कुणी सांगावं! (यमनीस) यमने, सासूबाईंना सांग कीं, मला तीर्थ मिळालें नाहीं आपण जेवावं [यमनी जातें.]

**चंद्र**.–हातांत काय तं तसबीर कीं काय!

**सई**.–(लज्जेनें ती पदराखालीं लपवून) छे, कांहीं नाहीं फळी ती हस्तिदंताची.

**चंद्र**.–(समजून) यावेळीं हातांत फळी घेण्याचा हा काय नेम! [आपल्याशीं] सांगितला असेल कुणी! [जवळ जाऊन ती घेऊन] मज बटकीपाशीं ही लाज कशाला! 'मी आपला जिवानिराळी असें' असेंहि आपणास वाटतं का? सांगा तसें वाटत असेल तर मी जाऊन जीव देते.

**सई**.–[हसून] कायग तरी वेडी बायको ही! कारण नसतां जीवावर उदार! मला बाई लाज वाटते, कोण काय म्हणेल कोण जाणें म्हणून मनाला लाज वाटते. येथें नसल्यावर माझ्यानें तर बाई क्षणभर तसबिरी शिवाय राहावत नाहीं.

**चंद्र**.–पण यांत वाईट तं काय? नाव कोण ठेवणार! ईश्वर उदंडकाळ तुमची अशीच प्रिती चालवो. आणि (बोटें मोडिते) दुष्टांचे डोळे फुटोत.

**सई**.–चंद्रभागा, आतां गडे वेळ जात नाहीं, तुला अंबाबाईची गाणीं येतात त्यांतलं एक चांगलंसं म्हण.

**चंद्र**.– आज माझा गळा बिघडला आहे तरी आपण सांगतां म्हणून म्हणतें.

(गाणें म्हणूं लागतें.)

## गाणें अंबेचें.

( त्रिजटे कशि गोपाहि नयनीं घनःशाम सांवळा.) या चालीवर.

दावि भवानी माते अंबे पदपद्में कोमळ ॥
सदय होउनी अंतःकरणीं दे इंगती निर्मळ ॥ धृ०॥
शिवपत्नी सौभाग्यवती कीं शंभुप्रिये तुजप्रती ॥
वानउनी यां अनंत वाद्यें गाती आणि नाचती ॥
जो वाहुनि तुज भक्त नियम अशि कीर्ति जनीं वागती ॥
राहती ऋद्धी सिद्धी त्यांच्या येउनि चरणाप्रती ॥
जाणतसे श्री शंकर सुंदर तुझें गायन मंजुळ ॥१॥ सद०
सतोष होउनि क्रीडे माजी तुजला गुणि काननीं ॥
जगचालक तो शंभू गळ्यांत व्याघ्रांबर वेष्टुनी ॥
यज्ञपती जो क्रोधें करितो संहारा त्रिभुवनीं ॥
अशा प्रभूतें भिल्लिणि वेषें तोषविलें गाउनी ॥
सेवा जगदंबे हें म्हणतां भवसागर तुं वळ ॥२॥ सदय०
( गाणें आटपल्यावर चौकांत जातात. )

---

## प्रवेश ६ वा

स्थळ — पारगांव [ कचेरी ]

पात्र.

शिवाजी, नेताजी, खंडेराव, कृष्णाजीपंत, गोपिनाथपंत, भूषणकवि, मोरोपंत पिंगळे व इतर लोक.

[ गोपिनाथपंत येऊन पोंचण्याचे अगोदर कचेरीचा थाट उत्तम करून व त्यांत एकांत जागा तयार करून शिवाजी कचेरींत बसला आहे इतक्यांत हुजऱ्या येतो.]

**हुजऱ्या.**— [ रामराम करून ] सरकार, अफझलखाना कडून गोपिनाथपंत नावाचा वकील सरकारची भेट घेण्या करितां दरवाजापाशीं आला आहे, आंत येण्याविषयीं परवानगी मागतो.

**शिवाजी**— [भूखनकविस] कविराज, वकीलास कचेरींत घ्यावें कीं कसें ?

**भूखन.**— महाराज, कहा है " सत्रूनानाभेसधर, आवत भेजतचार ॥ भेद समझके जय करे, ताते करो विचार" दुष्मनकी ऐसी तौर रहती के, आप या अपना नौकर भेस बद्दल आना या भेजना और हर एक मतलब अजमाना और अपना भला करलेना. वास्ते जो कुछ करना सो विचारसे करना.

**कृष्णाजीभास्कर.**— अहो भूखन, हा राजाचा संप्रदाय आहे. राजनीतींत सांगितलें आहे कीं. " भवेत्स्वपरराष्ट्राणां कार्याकार्यावलोकने ॥ चारचक्षुर्महीभर्तुर्यस्यनास्त्यंधएवसः " आपल्या किंवा शत्रूच्या राज्यांतील काम पाहण्या करितां वकील हा राजाचा डोळा होय, यास्तव त्याच्या द्वारें व्यवस्था जो राजा न पाहिल त्यास आंधळा म्हणावा. आतां वकील आपला भेद घेऊन जाईल म्हणून राजाने त्यांचा आंत प्रवेश होऊं न दिला तर सामादि विचार कसे चालतील?

**मोरोपंत**०— अहो पंत, आपण म्हणतां हें खरें; परंतु " छिद्रमर्मचवीर्यंचसर्ववेत्तिनिजोरिपुः ॥ दहत्येतगतश्चैवशुष्कवृक्षमिवानलः " जो शत्रूचें छिद्र, मर्म, पराक्रम समजून घेतो तो घरांतील अग्नि जसा लांकूड जाळितो तसा नाश करितो. याचा पूर्ण विचार व्हावा.

**भूखन**०– क्या अजबकी बात है! आगे ऐसा होगा, ऐसा होगा ऐसे गुमान करके तुरतकी बात छोडदेना ये बराबर नहीं क्यों के. निकटकाजकोंत्यजिदियो, लाय दूरकीबात ॥ तुरतसुहितकाकरतैंहमूरखअपनाघात ॥ वास्ते जो कुछ करना सो विचारसें करना.

**शिवाजी.**– कविराजाचें म्हणणें रास्त आहे, कारण शत्रूस साम, भेद यांणीं जिंकावे कां कीं, लढाई मध्यें जय अनित्य आहे म्हणजे त्याचा भरवसा नाहीं. मीं लहान असतां दादोजीनें मला एक वाक्य सांगितलेलें आठवतें तें हें कीं 'विजयंतुप्रियतेतारिन्नयुद्धेनकदाचिन ॥ अनित्योविजयो, यस्मात्दृश्यतेयुद्धमानयो:' म्हणून म्हणतों. तो वकील बोलावयास येणार, कचेरींत येऊन सरळ बोलून रस्ता धरील आणि जर गडबड दिसलीतर गुप्त हेर म्हणून पकडला जाणार नाहीं काय ? येऊंद्या. अफझलखानाचा पोंच व त्याच्या निरोपांत जीव काय आहे तें तर पाहूं [हुजऱ्यास ] येऊद्या आंत.

( रामजी जातो व गोपिनाथपंत कचेरींत येतो. )

**गोपिनाथ.**– ( मुजरा करून ) मी, अफझलखान नावाच्या सरदाराकडून आपली भेट घेऊन बोलण्या करितां वकील आलों आहें.

**शिवाजी.**– फार चांगलें आहे. [ आपल्या शेजारीं जागा देऊन ] बसावें येथें. ( तो बसल्या नंतर ) आपण जो कांहीं निरोप सांगण्यास किंवा बोलणें बोलावयास आलां असाल तें निर्भतेनें बोलावें, येथे सर्वही हिंदू असल्यामुळें कशाचेंही भय नाहीं. यास्तव अफझलखानाच्या तोंडचीं जीं अक्षरें असतील तीं उघडपणें बोलून दाखवावीं.

**हुजऱ्या.**– [ रामराम करून ] सरकार, अफझलखाना कडून गोपिनाथपंत नावाचा वकील सरकारची भेट घेण्या करितां दरवाजापाशीं आला आहे, आंत येण्याविषयीं परवानगी मागतो.

**शिवाजी**– [भूखनकविस] कविराज, वकीलास कचेरींत घ्यावें कीं कसें ?

**भूखन.**– महाराज, कहा है " सत्रुनानभिसधर, आवत भेजतचार ॥ भेद समझके जय करे, ताते करो विचार" दुष्मनकी ऐसी तौर रहती के, आप या अपना नौकर भेस बदल आना या भेजना और हर एक मतलब अजमाना और अपना भला करलेना. वास्ते जो कुछ करना सो विचारसे करना.

**कृष्णाजीभास्कर.**– अहो भूखन, हा राजाचा संप्रदाय आहे. राजनीतींत सांगितलें आहे कीं. " भवेत्स्वपरराष्ट्राणां कार्याकार्यावलोकने ॥ चारचक्षुर्महीभर्तुर्यस्यनास्त्यंधएवसः " आपल्या किंवा शत्रूच्या राज्यांतील काम पाहण्या करितां वकील हा राजाचा डोळा होय, यास्तव त्याच्या द्वारें व्यवस्था जो राजा न पाहिल त्यास आंधळा म्हणावा. आतां वकील आपला भेद घेऊन जाईल म्हणून राजाने त्यांचा आंत प्रवेश होऊं न दिला तर सामादि विचार कसे चालतील?

**मोरोपंत.**– अहो पंत, आपण म्हणतां हें खरें, परंतु " छिद्रमर्मचवीर्यंचसर्ववेत्तिनिजोरिपुः ॥ दहत्येतर्गतश्चैवशुष्कवृक्षमिवानलः " जो शत्रुचें छिद्र, मर्म, पराक्रम समजून घेतो तो घरांतील अग्नि जसा लांकूड जाळितो तसा नाश करितो. याचा पूर्ण विचार व्हावा.

**भूखन**०– क्या अजबकी बात है! आगे ऐसा होगा, ऐसा होगा ऐसे गुमान करके तुरतकी बात छोडदेना ये बराबर नहीं क्यौ के. निकटकाजकोंत्यजिदियो, लाय दूरकीबात ॥ तुरतसुहितकाकरतैंहमूरखअपनाघात ॥ वास्ते जो कुछ करना सो विचारसें करना.

**शिवाजी.**– कविराजाचें म्हणणें रास्त आहे, कारण शत्रूस साम, भेद यांणीं जिंकावें कां कीं, लढाई मध्यें जय अनित्य आहे म्हणजे त्याचा भरवसा नाहीं. मीं लहान असतां दादोजीनें मला एक वाक्य सांगितलेलें आठवतें तें हें कीं 'विजयंतुप्रियतेतारिन्नयुद्धेनकदाचिन ॥ अनित्योविजयो, यस्मात्दृश्यतेयुद्धमानयोः' म्हणून म्हणतों. तो वकील बोलावयास येणार, कचेरींत येऊन सरळ बोलून रस्ता धरील आणि जर गडबड दिसलीतर गुप्त हेरे म्हणून पकडला जाणार नाहीं काय ? येऊंद्या. अफझलखानाचा पोंच व त्याच्या निरोपांत जीव काय आहे तें तर पाहूं [हुजऱ्यास ] येऊद्या आंत.

( रामजी जातो व गोपिनाथपंत कचेरींत येतो. )

**गोपिनाथ.**– ( मुजरा करून ) मी, अफझलखान नावाच्या सरदाराकडून आपली भेट घेऊन बोलण्या करितां वकील आलों आहें.

**शिवाजी.**– फार चांगलें आहे. [ आपल्या शेजारीं जागा देऊन ] बसावें येथें. ( तो बसल्या नंतर ) आपण जो कांहीं निरोप सांगण्यास किंवा बोलणें बोलावयास आलां असाल तें निर्भतेनें बोलावें, येथे सर्वही हिंदू असल्यामुळें कशाचेंहि भय नाहीं. यास्तव अफझलखानाच्या तोंडचीं जीं अक्षरें असतील तीं उघडपणें बोलून दाखवावीं.

**भखन.**– ओहो! क्या महागराजका कहना है!! सुनो, राजनीतीमें कहा है " दूत सत्रु बानी कहे उसको समझो पाक ॥ वामों कटुवानी रहे कौन दूतका वाक" वकील जो, है सो दुष्मनका संदेसा केहेता तोभीउसको पाक समझना. क्यौं के, वो दुष्मनका मू है वैसा समझना. सिवाह उस केहेनेमें तेढी या बुरी जुबान होवे तो वकीलका कुछ वांक नहीं.

**गोपिनाथ.**– हे सर्व विचार सुज्ञांच्या अतःकरणांत वाग्रत असतात. ( शिवाजीस उद्देशून ) परंतु अफझलखानाचें लक्ष्य आपल्या कल्याणाकडे आहे.

**शिवाजी.**– [ मानकऱ्यांकडे पहून ] का अफझलखान दयाळू आहे की, नाहीं! आम्हीं इकडे तिकडे छापे घालतों म्हणून आमचें कल्याण करण्याची बुद्धी उत्पन्न झाली असेल! ( सर्व मंडळी गालांत हंसते ) खरेंच आहे तें, भला मनुष्य अपरिचित असला तरी सर्वत्रांचें कल्याणच इच्छितो, ( गोपिनाथपंतास ) अहो वकील, आपलें चालूद्या. आमचें हें उगच विनोदाचें बोलणें.

**गोपिनाथ.**– महाराजांनी निरोप ऐकिला म्हणजे मी बोललों हें खरें किंवा खोटें हें सहज समजणार आहे. महाराज ऐकावें. अफझलखानाचें असें म्हणणें आहे .कीं, अल्लिआदिल शहा पातशहा या देशाचा दक्षिणोत्तर अधिकारी आहे. आपण जरी मोठे झालों व हुषार असलों तरी त्याचे ताबेदार म्हणवितों. तेव्हां आपली हुषारी त्याच्या विरुद्धाकडे खर्च करण्यापेक्षां स्नेहाकडे खर्च करून एखादी पदवी मिळवावी म्हणजे ती सार्वकाल अगर कांहीं काल पर्यंत तरी टिकेल. दुसरें त्याचें असे म्हणणे आहे कीं, आपण जीं बंड

करितां तो किती दिवस निभावेल? आज ना उद्या कधीं तरी तुम्ही गोत्यांत येणारच, मग व्यर्थ प्राणास मुकावें यांत फळ काय? मी शिपायाचा बच्चा आहे, बोलेन एक व करीन एक हें कालत्रयींही घडणार नाहीं. जर तुम्ही मला भेटाल तर तुमच्या म्हणण्या प्रमाणे पातषहाकडून, झालेल्या अपराधांची क्षमा करवून तुम्हास वडिला प्रमाणे एखाद्या अधिकारावर कायम करवीन अथवा दक्षिणेचा सुभा तुम्हाकडे देऊन तुमचा मनोरथ पुर्ण करीन व तुमचे कपाळचा बंडपणा दूर करीन. आतां पाहाडांतील आणि झाडींतलि मुल्क तुम्हीं काबीज केला व आपणांस राजे म्हणून घेऊं लागलां तरी तुम्हांस राजेपणा कोणी दिला असें विचारल्यास उत्तर काय? शेवटीं बंडपणाच कायम राहिला कीं नाहीं!! याप्रमाणें माझा रास्त निरोप सांगून आपणास घेऊन येण्या विषयीं मला सांगितलें आहे, यावर आपला काय विचार आहे?

**शिवाजी.**–[ किंचित क्रोधास चढून ] अहो गोपिनाथ पंत, मी राज्यसुखाचा भुकेला नाहीं. माझ्या देशांतील बंडें मोडून प्रजा सुखी व्हावी व हिंदुधर्माची संस्थापना व्हावी ही माझी इच्छा आहे.

**गोपिनाथ.**–( शंकित होऊन ) बंड कोण?

**शिवाजी.**– तुमचा अलिअदिलशहा!

**गोपिनाथ.**– महाराज, अलिअदिलषहा बंडवाला कसा होईल?

**शिवाजी.**– योग्य प्रश्न केला, ऐका. हें सर्व भरतखंड हिंदुस्थान म्हणवितें. हा हिंदुलोकांचा देश. या देशाहून

भिन्न जो यवन देश त्या देशांतील हे मुसलमान. हे आमच्या देशांत जुलमानें सत्ता करितात तेव्हां त्यांस "बंडनाला" याशिवाय दुसरें काय नांव द्यावें? आम्हीं त्यांच्या देशांत जाऊन राज्य मिळविण्याची जर खटपट करितों तर आम्हां स बंड म्हणणें शोभतें, तसें तर मुळींच नाहीं. हे यवन आमच्या देशांत जबरीनें येऊन धर्म बुडवावयास लागले असें असून आम्हांस बंड म्हणणें किती रास्त आहे! हे चांडाळ मुसलमान पहा हिंदुधर्माचा कसा खराबा करीत आहेत तो!! [भूखन कवीस] अहो भूखन, यवनांच्या वर्तणुकीचें कवित म्हणा पाहूं.

**भूखन.**–सुनो पंडत, आप हिंदू हो इसलिये धरम वास्ते आपकूं जादा केहेनेकी जरूर नहीं तोभि कहताहूं "हिंदूको सहायहोयचालतऔरगझेबभूखनबखानिजातचालकौनढबकी॥ देवलगिरायमसीदजायजायबीनाकरतदैवतकूंतोरिफोरिपुरानी जोकबकी॥ हिंदूकोपकरउसकीचोटीमुंडवापडारेमुसल्मीनकेर कहतभगतकरोरबकी॥ त्रिसवेसरजलमधअबछुपबैठयोकौनबा ताएकसिवाझीनहोतोसुनतहोतसबकी॥

**शिवाजी.**– कां बकील, हें खरें कीं खोटें? फार काय सांगू! देशास मातीशीं मिळवून टाकिलें, हिंदूंचीं देवालयें विध्वंसून तेथें मजीदी बांधल्या व लोकांस मुसलमान केलें व करीत आहेत. त्यांच्या पूज्य मूर्ती फोडिल्या. मुसलमानी धर्म ग्रहण न करणारांवर असाह्य अशा शिक्षा योजिल्या, तसेंच जंजी या नावाचा कर बसविला. सारांश, त्यांचा हेतू कीं, सर्वांनी मुसलमान व्हावें. महाराज! अद्यापी आम्ही हा जुलूम सोसावा काय? ब्राह्मण अगर मराठे लोकांस निर्भय जागा राहिली नाहीं तर नाहीं, परंतु मोलमजुरी करून मिळविलेलें

अन्न धर्माचरणानें खाण्यासही मुष्कल अशी स्थिती गुज- रली आहे. जर कोणी परकी जबरदस्त गृहस्थ एखाद्याच्या घरांत जबरीनें शिरला व घरच्या मालकास जबरीनें वागवूं लागला तर प्रसंगवशांत निरुपायी होत्साता मालक त्याच्या ताब्यांत वागेल, पण जर मालकाच्या वृद्धआईची इजत घेण्यास तो परकी गृहस्थ प्रवृत्त होईल तर मग मालक जरी निर्बल असला तरी त्याच्यानें उगीच बसवेल काय? कधीं बसवणार नाहीं. जीव जावो अथवा राहो, परंतु जबरदस्ताची कुंदी काढण्यास क्षणभरही आळस करणार नाहीं हें खरें कीं नाहीं? त्याचप्रमाणें आमचा पुरातन हिंदुधर्म म्हणजे आमची वृधमाता तिची विटंबणा करण्यास या दुष्टांनी हात घातल्यावर आमच्यानें उगें राहावेल काय? आतां हेंच पाहा! फार लांब जावयास नको. तुह्मी हुषार कमी आहां काय, अथवा वझीरासारखा एखादा हुद्दा तुमच्यानें चालवला जा- णार नाहीं काय? सहज चालविला जाणार आहे, परंतु नाहीं. तुह्मी हिंदु पडलां, म्हणून तुम्हास चाकराच्या चाकराचे चा- कर अशा अधिकारावर नेमलें आहे, हा जात्याभिमान नव्हे काय? हे जर आपण यवन असतां तर आपणास वझीर किंवा अफझलखान बनविलें असतें. हेंच ढळढळीत उदाहरण दिसत आहे हा जात्याभिमानी राजा या हिंदुप्रजेस काय उपयोगी! राजा प्रजेच्या धर्माचा असला म्हणजे त्यांची व्य- वस्था नीट होते.

**गोपिनाथ.**—महाराजांचें म्हणणे खरें आहे; परंतुः—

**शिवाजी**—कां परंतु कां?

**गोपिनाथ.**—परंतु इतक्याच करितां कीं, आपलें म्हणणे जरी खरें तरी ते सबळ व आपण निर्बल असून त्यांचे चा-

कर याजकरितां आपल्या गोष्टी सत्य असून मिथ्या अशा समजल्या पाहिजेत. विजापुरकरांची क्षमा मागून कालक्रमणा करावी हेंच योग्य आहे.

**शि०.**–पंत, हें तुमचें म्हणणे मला विपरीत वाटतें. ते बलाढ्य म्हणजे देव किंवा राक्षस आहेत काय? आणि आपण निर्बल म्हणजे मश्यक किंवा चिखलांतील किडे आहेत काय? तर नाहीं. आम्हांत व त्यांच्यांत तिळभरही फरक नाहीं. मात्र इतकेंच कीं, जसा त्यांचा एकोपा आहे म्हणजे एकानें योजिलेल्या कामास बाकीचे लोक जसे मदत करितात तसें आम्हा लोकांत नाहीं म्हणून आम्ही बलहीन, परंतु जर एकी होईल तर अलिअदिलषहास तर काय पण औरंगझेबासही स्वदेशास पळावें लागेल. कसेंहो भूखन?

**भूखन.**–सच्च है सरकार. "वर्षधाराधरोमेघस्तृणैरपिनिवारयेत ॥ घासके पोलीसें बारषसें अपना बचाव करनेमें आता इसमाफक बहुत कमकूवत आदमी एक जगे मिलेगे तो बडे सापकूं खैंचेंगे सरकार.

**शि०.**–अहो पंत, माझें असें म्हणणे नाहीं कीं, मला राजा करावा. तर या देशांत "भाव, राणे," वगैरे पुष्कळ राजकुलांतील पुरुष आहेत त्यांपैकीं हरकोणासही या देशाचा राज्याधिकार देऊन या यवनांनी स्वदेशास जावें. आणि तसें झाल्यावर मग त्यांचा आमचा सल्ला; परंतु तसें होत नाहीं तें असो. मी म्हणतो कीं; जसा ते जात्याभिमान बाळगतात त्याप्रमाणे आम्हांपैकीं प्रत्येक मनुष्यानें बाळगिला पाहिजे म्हणजे सर्वांच्या मनोदयानुरूप घडणार आहे.

**गोपिनाथ.**–महाराज, तूर्त अशा कामीं अभिमान

वाळगणें म्हणजे असल्या सुखाचा नाश करणें होय, याज करितां सांप्रतच्या कालावर नजर देऊन वर्तावें त्यांतच कांहीं तरी कल्याण होण्याचा संभव आहे.

शि०.— मी आपल्या बोलण्याचा अर्थ समजलों. [उठून गोपिनाथ पंताचा हात धरून तयार केलेल्या ऐकांत जाग्यांत जातात.] अहो पंत, एथें कोणी परकी नाहीं यास्तव मी आपणास आपला हेतू दर्शवितों. त्यास तुम्हां कडून साह्य पाहिजे तें आपण द्याल कीं नाहीं!

गोपि०.— महाराज! हें काय आपण म्हणतां? मी सामान्य मनुष्य सरासरी नौकरी करून आपला चरितार्थ चालवावा ही माझी शक्ती त्या मजकडून आपणास काय मदत होणार!

शि०.— तें सर्व मी समजतों, आणि या प्रसंगीं जी मदत मला पाहिजे ती तुम्हां वांचून दुसऱ्या कोणा कडून होणार नाहीं म्हणून मी इतकेंच सांगतों कीं, तुम्ही मला अनुकूल व्हावें. आणि त्या बद्दल मी आपणास काय साह्य करावें तेंही सांगावें. जें मी इच्छितों तें केवळ माझ्या एकट्याच्याच कल्याणा करितां नाहीं यास्तव माझ्या उद्देशास आपण मान्य व्हावें अशी आशा आहे.

गोपि०.— महाराजांचा हेतु मला कळल्यावर मग सामर्थ्या प्रमाणें नौकरी करण्यास मजकडून अनमान होणार नाहीं मात्र त्यांत माझा बचाव करावा.

शि०.— ठीक आहे. मी इतकें म्हणतों कीं, आपण मला साह्य होऊन अफझलखानाची व माझी एकांतीं भेट होईल असें करावें व हर कोणत्याही प्रकारें माझ्या हिताक

डे तुमचें लक्ष्य रहावें, आणि तें झाल्यावर आपली इच्छा ही मला कळवावी.

**गोपि०.**— महाराज, हें कृत्य कांहींसें कठीण आहे. तथापी मी कबूल करितों कीं, भेटीचा योग आणितों. परंतु तो मोठा पराक्रमी आहे यास्तव आपण आपल्या बचावा विषयीं कशी तजवीज कराल ती मात्र योग्य झाली पाहिजे. आतां माझा हेतू म्हणाल तर इतकाच कीं, माझ्या कुटुंबाचीं सर्व मनुष्यें हिवरे गावीं आहेत त्यांत मी सुखानें राहावें इतकाच आहे.

**शि०.**— ठीक काहे, या शिवाय दुसरी कांहीं इच्छा नाहीं ना?

**गोपि०.**— जास्त कांहीं नाहीं. मात्र कृपा सदोदित असावी हें मागणें आहे.

**शि०.**—[कचेरींत येऊन हिवरेगाव गोपिनाथ पंतास इनाम दिल्याची सनद लिहून घेऊन आत येतो व गोपिनाथ पंताचे हातीं देतो.] ही घ्या. वाचून पाहा.

**गोपि०.**— ( वाचून पाहून ) महाराज दयाळू आहेत. त्या अर्थीं सर्व योग्यच आहे.

**शि०.**— पंत, मी आपणास प्रतिज्ञापूर्वक सांगतों कीं, जगदंबेच्या कृपेंकरून जावत्काल पर्यंत मराठ्यांची गादी चालेल तावत्कालपर्यंत ही सनद राहील यांत तिळभर शंका नाहीं. मात्र मी इतकेंच म्हणतों कीं, जशी मी प्रतिज्ञा केली तशी तुम्हा कडून झाली पाहिजे.

**गोपि०.**— ठीक आहे, मीही प्रतिज्ञा करितों कीं, जर देशकल्याणा करितां आपला उद्देश आहे तर मी कदाचित किंचित पातक आहे असें जरी कर्म केलें तरी ईश्वरापाशीं

मोठ्या शासनास पात्र होणार नाहीं. महाराज, जें मी बोल-लों हें करण्यास जर चुकेन अगर यांत कपट ठेवीन तर ईश्वर मला प्रखर शासन करो. असो, बरें सरकार, आपण भेटीचा योग आणून पुढें काय तजवीज करणार ?

**शिवाजी.**— सांगतों ऐका. तुह्मी त्याकडे परत जाऊन " शिवाजी तुम्हास शरण आहे व आपल्या म्हणण्या प्रमाणें कबूल असून भेटण्यास तयार आहे ; परंतु त्याची इतकीच विनंती आहे कीं, आपण मेहरबानी करून प्रतापगडीं यावें म्हणजे तो समक्ष क्षमा मागेल असें सांगून, बरोबर हत्यारबंद एकच मनुष्य आणवावा व तो ही एकच मनुष्य बरोबर ठेविल, असें सांगण्याचें कारण तो अगोदर भित्रा आणि आपण आल्याची बातमी कळल्या पासून तर त्याचा धीर सुटला आहे. या प्रमाणे त्यास कळऊन भेटीचा योग आ-ल्यावर जगदंबेचे दयेने मनोदया प्रमाणे सर्व घडून येईल.

**गोपि०**— ठीक आहे, आपण आज्ञा केल्या प्रमाणें त्या-स पूर्ण भरवसा दाखवून भेटीचा योग आणितो, यश देणा र ईश्वर समर्थ आहे. मला आतां आज्ञा असावी.

शि०— ठीक आहे, बोलल्या प्रमाणें व्यवस्था होऊन परवांचे दिवशीं भेटीचा योग यावा.

**गोपि०**— ( नमन करून )-सेवकाची विनंती इतकीच आहे कीं, महाराजांनीं सावध पणानें वागावें.

( निघून जातो )

**शि०**— ( कचेरींत येऊन मोरोपंतास ) कार्यसिद्धी आ-हे. पंत, आपण कांहीं मावळे व कांहीं पठाण फौजे सह जावळीस जाऊन गुप्त रूपें राहून व बाकी लोकांसह पालक

रांनीं येथें किल्यावर राहावें. याप्रमाणें व्यवस्था झाल्यावर मग जसा प्रसंग येईल तसें वर्ततां येईल.

**मोरोपंत**०— आज्ञा सरकार. सैन्य संबंधी सर्व बंदोबस्त उत्तम रीतीनें ठेवितों. महाराजांनीं निःकाळजी असावें. पण इतकी विनंती आहे कीं, अफझलखान आपणावर येणार कीं आपण अगोदर त्यावर चढून जाणार हें अगोदर आह्मास समजलें असतां बरें होईल.

**शि**०— [ उभयतांस जवळ बोलाऊन ] अफझलखान आम्हावर येत नाहीं व आम्ही त्यांजवर जात नाहीं, आलेल्या वकिलाचे द्वारानें किल्याच्या मध्यभागावर, बरोबर एकेक हत्यारबंदानिशी येऊन परस्परांनीं भेट द्यावी असें ठरविलें आहे आतां मी असी योजना केली आहे कीं; भेटीस जाते वेळीं आंगरख्याच्या आंत चिलखत घालावें, व उजव्या अस्तनींत गुप्त बिछवा शस्त्र घालावें आणि डावे हातांत वाग नख्यांचा पंजा घालावा. अशा तयारीनें भेटीस जावें. प्रसंगीं दोन शस्त्रें आपणापाशीं पाहिजे. कारण तो जातीने मुसलमान आहे. ही मसलत तुह्मास मानवतेना.

**मोरोपंत व पालकर**.— विचार योग्य आहे व सुसाध्य आहे ,परंतु ईश्वर कृपा पाहिजे म्हणजे झालें. कदाचित नच साधे तर आपल्या फौजेचे दोन भाग आहेतच, प्रसंगी एक वरून आणि येक खालून येऊन त्याच्या फौजेची कत्तल करण्यास वेळ लागणार नाहीं. असो आतां आज्ञा व्हावी व सरकारांनीं ही प्रतापगडीं जाण्यास निघावें.

[ या प्रमाणें ठरून उभयतां फौजेसह दोन ठिकाणी जातात व शिवाजी लोकांसह प्रतापगडीं परत येतो. ]

### प्रवेश ७ वा.

स्थळ— प्रतापगड ( अंतःपूर )

पात्रें.

शिवाजी, सईबाई, चिमा व यमनी.

( प्रहर रात्र झाली आहे, सईबाई महालांत पलंगावर बसली आहे. यमनी जवळ उभी आहे )

**सईबाई.**— ( जांभयादेत ) यमने, चिमा कुठें आहे ग?

**यमनी.**— येवढा वेळ येथें होती. आतांच चौकांत गेली आहे, केव्हां पासून ती आपल्या येण्याची वाट पाहात होती.

**सई.**— कशा साठीं माझ्या येण्याची वाट पाहात होती, रोज नाहीं कधीं वाट पाहात ती? कांहीं बोलत होती कीं काय?

**यमनी.**— नाहीं. मजपाशीं कांहीं नाहीं, पण मी अनमानान ह्मणतें कीं, आपणा पाशीं ती कांहीं सांगणार आहे, मग तें काय असेल तें ती जाणें.

**सई.**— असें काय सांगणार आहे कीं, ज्या साठीं मुद्दाम माझ्या येण्याची वाट पाहात बसली होती. काय असेल तें असो. माझ्या मनाला तर हुरहुर लागली. काल पासून वाड्यांत नसायचें आज दोन दिवसांत दर्शन नाहीं. कोठें जाणे जाणें असेल तें असो. कालचा दिवस व आजचा हे दोन दिवस वाट पाहातां पाहातां गेले. तूं आतां लवकर जाऊन चिमाला बोलाऊन तरी आण.

**यमनी.**— हो मी जातें बाई साहेब.

( इतक्यांत चिमा येते हें पाहून तिला )

**सई.**— चिमा, आलिस का? तूं चौकांत कशाला गेली

होतीस आणि माझी वाट कशाला पहात होतीस?

**चिमा.**–(हिरमुसलें तोंड करून.) नाहीं बया साहेब उगच.

**सई.**– हेंग काय? उगच म्हणजे! उगच म्हणतेस पण तुझें तोंडच सांगत आहे कीं मनांत कांहीं तरी आहे म्हणून. सांग तूं आज अशी कां ती ? सासुबाई कांहीं बोलल्या कीं काय?

**चिमा.**– नाहीं, कुणी बालल नाहीं बया; पण जिवाजया मुळें तं ऐकल्या पासून जिवाला काळजीनं झुरणी लागली आहे जशी. ती अंबाबाई इडापिडा टाळो नि माझ्या जिवाचा सुघड ठेवो ( बोटें मोडते. )

**सई.**– ( साशंकित होऊन ) चिमा हेंग काय? असें अत्र वट काय बोलतेस. तुझा मेला हा असाच हेकट स्वभाव, दुसऱ्याला विचारांत पाडायचं. सांगतेस का नाहीं कायतें.

**चिमा.**– बाई साहेब, राग नका भरूं. मी तें सांगायला करतें पण तोंडा वाटे माझ्यानं बाहेर निघत नाहीं. ( डोळ्यांनी पाणी आणिते. )

**सई.**– [ घाबरी होऊन ] चिमा, सांग काय असेल तें. कांहीं असो, मी आपलें मन कठोर केलें आहे. या दैवीं काय काय लिहिलें आहे तें कुणाला ठाऊक. बोल येकदांचं.

**चिमा.**– ( डोळे पुसते. ) बाई साहेब, मी संध्याकाळीं वाड्यांत येतांना दिडी दरवाजापाशीं कचेरींतले कोणी लोक आपापल्यांत बोलत होते, ते काय बोलत होते तं सर्व मला समजलं नाहीं पण इतकंच समजलं कीं, महाराजांला:– ( गहिवर येतो. )

**सई.**– ( उर भरून येऊन ) चिमा, आतां अडखळूं नको. ऐकुवा मला एकदांचं. काय हें ईश्वरा! ! !

**चिमा.**— बया, घाबरूं नका. मी सर्व सांगतें. महाराजां ला धरून नेण्या करितां विजापुरच्या बादशहा कडून एक, मोठा मुसलमान सरदार निघाला आहे. त्या विचारांत महाराज आज दोन दिवस गुंतले आहेत असें बोलत होते. ( सई घाबरी होऊन पलंगावरून खालीं पडते व तिला चिमा व यमनी सावरून धरितात. )

**चिमा.**— बया सावध व्हा सावध व्हा. घाबरूं नका. मी पुढें सांगतें तें ऐका. उठा उठा!!

**सई.**— ( कांहींशी सावध होऊन ) माते अंबे, काय मी ऐकितें हें स्वप्न तर नाहीं ना! कशाचें स्वप्न. दैवहीन मी म्हणून हा प्रसंग मजवर. गुरू महाराज! सांभाळा, कन्येला सांभाळा. लेकरांला पदरांत घ्या. आणि मुलीला चुडे दान द्या.

**चिमा.**— [ हंबरडा फोडिते ] बाई कायहे. जळो माझी वाचा एकदांची कोठूनचं मी बोलल्यें ही. मजकडे पाहा. ही बटीक काय म्हणत आहे तें ऐकाल तर खरें. ( हाताने चाळविते. )

**सई.**— ( उसासा टाकून ) माझ्या मनांत पुष्कळ दिवस हें घोळत होतें कीं, जिकडे तिकडे स्वाऱ्या करावयाच्या होतात तेव्हां येखाद्या वेळीं जिवावर प्रसंग येईल म्हणून, तें आज अनुभवास आलं. जळो तं राज्य नि जळो ती संपत्ती. देवा, मला कशाची आशा नाहीं. माते अंबे, मी काल पासून तीर्थासाठीं वाट पहातें, म्हटलं असेल कुठे जायचं झालं; पण आतां हें, मी चांडाळीण, हतभाग्या कानानी ऐकतें. सासुबाई!!

**चिमा.**— बया, घाबरूं नका. महाराज सुखरूप आहेत उठा. माझं बोलणं तरी ऐका.

**सई**—[ सावध होऊन ] नकोग मला आतां खोटं सांगून फसवूं. मी तुझं प्रथम तोंड पाहिल्या बरोबर समजलें होतें कीं कांहीं तरी दुश्चिन्ह आहे तं खरं झालं. चिमा, कायग करूं आतां, येव्हांशीं कुठे असावयाचं असेल.

[ मोठमोठयानी रडतें ]

**चिमा.**—बाई साहेब; याचं नाव काय, लोक काय म्हणतील मी सांगतें माहाराज पारगांवास गेले आहेत आणि इतक्यांत परत येण्याची वेळ झाली आहे. या प्रसंगीं जर ते आले आणि हा प्रकार पाहिला तर या बटकीचं एक हाड तरी पुनः आपल्या नजरेस पडेल काय? उगी राहा बया, उगी राहा!!

**सई.** (डोळे उघडून) तूं काय म्हणतेस! आतां येणे होईल म्हणून? तुला कुणी सांगीतलं! खरं सांग, माझ्या समजुतीकरितां खोटं सांगूं नको.

**चिमा.**—तुमच्या गळ्याची आण बया. खचित इतक्यांत माहाराज येतील. माझी विनंती पायापाशीं इतकीच आहे कीं, [आपणाकडे बोट दाखवून] या चांडाळणीची वाचा वदली येवढें माहाराजांपाशीं सागूं नका बरं.

**सई.**—चिमा तूं भिऊ नको. तूं दरवाजापाशीं जाऊन बैस आणि स्वारी आल्याचं तुला कळलं म्हणजे धांवत येऊन मला कळीव. जा तर लवकर. [चिमा जाते]

**यमनी.**—बाईसाहेब, आपणास दोन दिवसांचं उपोषण आहे, दुःख करून प्रकृती बिघडेल. महाराज आतां येतील. बया साहेब, आपल्या पदरीं माझ्यासारख्या हजारो लोकांचं

अन्न आहे, ईश्वर आपणास कधींही संकटांत ठेवणार नाहीं. उगी राहा.

**सई.**—यमने, पोरी तुझे गोड शब्द माझ्या जिवाला सुख देतात; पण कायग करूं! तुला सांगतें, या चातुर्मासांत तीर्थ घेण्याचा नियम कां केला म्हणशील तर त्याचें कारण हेंच कीं, मला आठ आठ दिवस दर्शनसुद्धां होत नसे, म्हणून तिर्थाच्या निमित्तानें भेट तरी होईल असं म्हणत होतें, पण तो माझा हेतू कुठूनचा पूर्ण होणार! असो, त्याचेंही मी कांहीं म्हणत नाहीं, पण हा ईश्वराचा कांबरें कोप व्हावा! तेव्हां मीच हतभाग्या. दुसऱ्यास काय बोल लावावा.

[पलंगावरून उठून सचिंत इकडे तिकडे पाहाते तों इतक्यांत हास्यमुखी चिमा धांवत येते.]

**चिमा.**—बया, तुमच्या चुड्यांला उदंड आयुष्य असो. महाराज वाड्यांत हे आतांच आले. त्यांस मी डोळ्यांनीं पाहिलें, मला असें वाटतं कीं, ते इतक्यांतच इकडे येतील.

**सई.**— (लगबगीनें) चिमा, यमनीस घेऊन त्या परांच्या गाद्या आंथरून चांगली बिछाईत करा, त्यावर किनखाप आंथरा, चांदीच्या समयांचा जोड पुढें सरसावा, अत्तरदानी गुलाबदानी व तयार केलेले जाईच्या व चमेलीच्या फुलांचे हार तबकांत भरून आरतीची तयारी करा. [त्या सर्व तयारी करितात.]

**चिमा.**—सर्व तयारी झाली आतां यांत कांहीं न्यून असेल तर हुकूम करा.

**सई.**—ठीक आहे, कांहीं न्यून नाहीं, मात्र आतां इतकेंच कर कीं; माझी जडावाची झारी जी मी पूजेचेवेळीं घेतें ती भरून स्वच्छ पाणी घेऊन ये.

( चिमा चौकांत जाते इतक्यांत शिवाजी महालांत प्रवेश करितो, त्यास पाहून सई पंचारती ओवाळून यमनीच्या हातीं देते व गळ्यांत हार घालिते. नंतर शिवाजी तिचा हात धरून उभयतां बैठकीवर बसतात. यमनी बाहेर जाते.)

**शिवाजी.**—(सईबाईच्या खांद्यावर हात ठेऊन तिच्याकडे पाहून) कां आज तोंड सुकून गेलें आहे अगदीं? चेहरा चिंतातूर दिसतो.

**सई.**—(उसासा टाकून) आम्हा बायकाना कशाची चिंता! चिंतेचे डोंगर काय ते पुरुषा पुढें!

**शिवाजी.**—वहावा! काय सरळ उत्तर!! समयोचित व आनंददायक उत्तर देण्याविषयीं आपला उपदेशच घ्यावा. असो, पण आज मुखश्री म्लान दिसते खरी. [पाठीवरून हात फिरवितो.]

**सई.**—लोकांसारखं वर वर गोड बोलून दुसऱ्याचं मन स्वाधीन करून कुठं मला घेतां येतं! त्या विषयीं उपदेश कुणाला पाहिजे तर येथला घ्यावा. (श्रमी होते.)

**शिवाजी.**—[हसून] कां मी खोटंका बोललों?

**सई.**—नाहीं कुणी म्हणावं!

**शिवाजी.**—[न्याहाळून पाहातो] अरे! मी विनोद समजतों; पण हा विनोद नव्हे, डोळे आरक्त असून पाण्यानें भरले आहेत, आंगास कंप सुटला असून तप्त झालें आहे, केश विखुरलेले आहेत. [स्मरण केल्या सारखें करून] अरेरे!! किती मी निर्दय हा! नियमाची मला मुळींच आठवण नाहीं. दोन दिवस उपोषणें पडलीं ना! [ हनुवटी धरितो ]

**सई.**— उपोषणाचें काय मेलं! आहेच मला सवई, आज-

च काय. च्यार च्यार दिवस जातात तेंव्हां कुठे स्मरण होतं. जळला आह्मां बायकांचा जन्म. सर्व काळ दुःखच भोगावयाचं. ज्या प्राण्याच्या पदरीं महत्पातक त्यासच ईश्वर स्त्री जन्म देतो आणि हें खरेंच आहे कीं, पातकी प्राण्यास या शिक्षे पेक्षां दुसरे शासनच ईश्वर देत नाहीं. मात्र त्यांत इतकंच कीं; जी कुणी पुण्यवान स्त्री असेल व तिजवर ईश्वर कृपाकरून, प्रीती करण्या विषयीं पतीच्या मनांत संचार करीत असेल ती कांहींशी दैववान समजावयाची. नाहींतर मजसारख्या जगांत अगणित आहेत, जन्मास येऊन आणि न येऊन सारख्याच.

**शिवाजी.**— काय वर्षाव हा, माझा काय अन्याय असेल तो असो, मला तर स्मरत नाहीं; पण इतकेंच म्हणतों कीं, जर तो मला कळेल तर त्या विषयीं मीं क्षमाहि मागेन. (तिचें मुख समूर करून) मला कळवाल का काय अन्याय तो?

**सई.**— दुसऱ्याची हेळणा करणें ह्मणजे कसं बाळकडूच आहे. थट्टे थट्टेनें फजिती करावयाची. माझी कुठे एवढी पुण्याई आहे कीं, मजपाशीं माफ मागावी. मला इतकी नाहीं आशा. पायांतील जोडा पायांत असावा म्हणजे त्याचा उपयोग झाला. ज्या बायका त्या सुखाची आशा करीत असतील त्या असोत. मी इतकेंच इच्छितें, अहो रात्रांतून दोन घटका माझ्या हातून ममतेनं सेवा घ्यावयाची झाली म्हणजे मी कृतकृत्य झालें.

**शिवाजी.**— ( आलिंगून ) काय रोख, काय भाषणाची प्रौढी! जर कोणी ऐकेल तर तो म्हणेल कीं; या उभयतांचें अनंत जन्माचें वैर आहे. पुरे आतां रोष. मनांत काय आहे तें कळवा.

**सई.**— ( गळ्यास मिठी मारून ) कळवावयचं कांहीं नाहीं. मी विचारतें तेवढे खरं सांगायचं होईल का ? होकार येत असेल तर विचारतें, नाहीं तर सर्व थट्टाच !

**शिवाजी.**— हो हो ! विचारा. मजकडून नकार नाहीं. आज पर्यंत कधीं तरी असें झालें आहे का ?

**सई.**— ( प्रीतिनें डोळे मोडून ) छे छे, कधीं नाहीं ! विचारल्या बरोबर खरं तयारच. उगच हेळणा नका करूं. माझी खातरी आहेच कीं, खरं मला कधीं समजायचं नाहीं, पण जीव मेला वेडा राहत नाहीं म्हणून विचारतें.

**शिवाजी.**— काय? मी बे भरवशाचा? मज विषयीं खात्री झाली आहेना! असो, विचारा काय विचारावयाचें तें. मला माहीत असेल तें खरं सांगेन, मग खरं वाटो अगर खोटं वाटो.

**सई.**— विचारतेंच तर मग. आपण वरवर मला आनंद दाखविता; पण जीवाला आपल्या मोठी कांहीं तरी काळजी आहे हें मला पक्कें समजतें. तर ती कोणती आहे ती सांगावी आणि जर मला ती न कळेल तर आज पासून अन्न न घेतां या पायांशीं प्राणच देईन. हें मी पायाचीच शपथ वाहून सांगतें ( गहिंवरते )

**शिवाजी.**— ( मायेने मोहून ) जिवलगे, तुला दुःखी पाहिलें म्हणजे माझा जीव कासावीस होतो. आतां हें खरें कीं, ज्या गोष्टी पासून यत्किंचित तरी तुला वाईट वाटेल असें मला वाटतें; ती गोष्ट मी तुला कधींही कळवीत नाहीं. हा जरी माझा नित्य नियम आहे तरी आतां तुझी मुखश्री म्लान पाहून माझें मन, पोटांतील दुःख तुला सांगण्या विषयीं सांगतें. ( शेल्यानें तिचे डोळे पुसतो ) मला जिवंत धरून नेण्याची प्रतिज्ञा करून विजापूरच्या

पातषहाकडून अफझलखान नावाचा बलाढ्य सरदार निघून पारगांवा पर्यंत येऊन पोंचला आहे. त्याजकडे वकील पाठवन सल्ला करून उद्यां एकांती परस्पर भेट घेण्याचें ठर विलें आहे, त्या प्रसंगी अंबाबाई आज्ञा देईल तरच आपला बचाव होण्याची संधी आहे, तथापि आज पर्यंत आपणावर जे जे संकटाचे प्रसंग आले त्यां पेक्षां हा भयंकर आहे. असो, श्रीजगद्गुरूचे कृपेनें सर्व मसलत निर्विघ्नपणें शेवटास जाईल. या बद्दल काळजी करण्याचें कांहीं कारण नाहीं.

सई.— ( उसासा टाकून ) माझें कोणी ऐकणार नाहींच; पण मी असें म्हणतें कीं, अष्टौप्रहर तापत्रय भोगून आपला जीव धोक्यांत घालण्यापेक्षां ईश्वरानें दिलेली भाजीभाकर खाऊन राहणें बरें. मेल्या राज्यसुखा-ला डोईवर घेऊन काय करायचं, त्यांत अधीकतं काय ! निद्रा नाहीं, वेळीं अन्न नाहीं आणि चित्ताला स्वस्थपणा नाहीं.

शिवाजी.— छे छे छे ! ही तुझी समजूत अगदीं खोटी आहे. आम्ही जर देशाचा कळवळा न बाळगावा तर गाई ब्राह्मणांस होणारा त्रास कोणी निवारण करावा? मला दादोजीनें मरतेवेळीं असें सांगितलें आहे कीं, " शिवाजी, तूं चपळ आहेस आणि तुझी परोपकारबुद्धी आहे यास्तव सार्वकाल गाई ब्राह्मणाचें संरक्षण करीत जा, म्हणजे त्या योगानें तुला सर्व कामांत ईश्वर यश देईल " तसेंच सद्गु-रू रामदासही नित्य सांगतात आणि तें खरें आहे. तूं पाहा कीं, मनुष्य जन्मास येऊन जर त्यानें परोपकार न केला किंवा देशाच्या सुखाकरितां न जपला, तर या जगां-त अगणित जीवजंतू जन्मास येतात कीं, ज्यांची गणतीही नाहीं त्यांतच तो गणला जाणार नाहीं काय ? जन्मास

आला किंवा मरण पावला हें जर जगांतील लोकांस माहीत नाहीं तर जन्माचें सार्थक तें कोणतें? पुराणांतील अनेक धार्मिकराजांच्या कथा तूं ऐकिल्या असशील; त्यांत, बली, ताम्रध्वज, मयूरध्वज, धर्म, रामराजा, कर्ण यांणीं आपलें आयुष्य कसें घालविलें त्यांची आठवण कर. तांम्रध्वजा सारख्यांनीं तर स्वतांचीं शरीरेंही परोपकारार्थ अर्पिलीं, सारांश, परोपकारा सारखें पुण्य नाहीं आणि तो केल्याशिवाय जो मनुष्य राहील तो मनुष्यांत गणला जात नाहीं. यास्तव केवळ परोपकारकृत्याकरितां यत्न करीत असतां जरी मृत्यु आला तरी तो श्रेयस्करच होय.

सई.–सर्व गोष्टी खऱ्या आहेत, पण ते मेले पठाण बोके, निर्दय, ज्याच्या मनाला दयेचा वाराही लागलेला नाहीं आणि आपली मुर्ती लहान, सकुमार यास्तव त्याच्याशीं आपला कसा निभाव लागेल! माझा जीव थर थरां कांपतो. मी ह्मणतें, आपण परोपकारार्थ जर आयुष्य खर्च करणार तर सासूबाईला, मला व बाळा संभाजीला बरोबर घेऊन तीर्थ यात्रेस चलावं आणि कोणी दुःखी दृष्टीस पड ल्यास शक्त्यनुसार त्यास मदत करावी. मला घोडा नको, पालखी नको, मी पायानें चालेन, उपोषणें पडल्यास सोशीन किंवा निर्वाहा करितां भिक्षाही मागेन, पण हीं राजसुखें "सुळावरील पोळी" प्रमाणें मला स्वर्मीही नकोत. मी पांया पडतें, माझी विनंती ऐकावीं. मुसलमानाचें नाव ऐकिल्या बरोबर माझे आंगाचें पाणी मरतें. हें माझें बोलणें जर नाकारणें असेल आणि बोलल्या प्रमाणें करून या बटकीस दुःखांत टाकणें असेल तर अगोदर आतांच या हातांतील तलवारीनें माझें शीर निराळें करावें आणि मग जाण्याची

तयारी करावी आणि तेंही जर न होईल तर बाळा संभाजीला सासूबाईच्या स्वाधीन करून या पायांपाशीं प्राण देतें. याचें उत्तर मला मिळालें पाहिजे.

**शिवाजी.**—काय वेड हें, अग, तूं तर अगदीं असमंजस पणाच्या निकरावर आलीस अशी घाबरतेस कां? ते मुसलमान ह्मणजे पराक्रमी आणि आमचे मावळे निर्बल असें तुला वाटतें काय? ईश्वर यश देईल तर आम्हीं त्यास सहज जिंकून येऊं. (पाठ थापटून) तूं भिऊं नको, समर्थांची, मातेची व अंबाबाईची आज्ञा घेऊन गेल्यावर मग अपयश येईल असें तुला वाटतें काय? तुला माहीत आहेच कीं, सद्गुरूची वाणी कधीं असत्य होत नाहीं ती!

**सई.**—सर्व खरें; पण या भयंकर कृत्यास माता, जगद्गुरू किंवा सासूबाई यांपैकीं कोणीही आज्ञा देणार नाहींतच.

**शिवाजी.**—जर या त्रिवर्गांनींही आज्ञा दिली तर तुम्हांकडून हरकत नाहींना? कसें?

**सई.**—असें होणारच नाहीं. आणि जर आज्ञा दिलीच तर मी कांहीं न बोलतां उगी राहिन; पण जेथपर्यंत आपण परत याल तेथपर्यंत तुळसी पासून हालणार नाहीं.

**शिवाजी.**—बरें चला, देवघरांत जाऊन पूजा करून सर्वत्रांची आज्ञा घेऊं. (दोघेंही उठून चौकाकडे जातात)

---

# अंक २ रा.

श्रीमन्वेदोक्तधर्मक्षयधरुनिमनींम्लेच्छीनिर्माणझाले,
शिक्षात्यांतेंकरायादढमनकरुनीयत्नहीफारकेले ।।
वाहेदीनप्रजांचेंअसुखस्वशिरिंजोतोशिवाजीसुधीर,
जीमाताधन्ययातेंप्रसवुनिजाहलीध्याजगींतीसवीर।। १

## प्रवेश १ ला.

स्थळ—प्रतापगड [ देवघर ]

पात्रें.

**शिवाजी**, **जिजाबाई** [शिवाजीची आई] **सईबाई** [शि० स्त्री ] **रामदास**,

( शिवाजी स्नान करून पूजा साहित्यासह देवघरांत जाऊन पूजा अटोपून ध्यान करितो. )

**शिवाजी**.— हे जगज्जननी, हे मातोश्री, हे भवानी, मी अज्ञबालक प्रार्थना करितों तिला आपल्या कोमल अंतःकरणांत जागा द्यावी. माते अंबे, आबालवृद्ध देशबांधवांस सुख व्हावें, वेदोक्त धर्माची वृद्धि व्हावी, गोब्राम्हणांचा प्रतिपाल व्हावा, लोक स्वधर्मवर्ती व्हावें आणि अनादि वेदोक्तधर्माचा उच्छेद करणारे यवन प्रस्तुत बलाढ्य होऊन हिंदुधर्मानुयायी प्रजांस त्रास देत आहेत, त्यांचे पारिपत्य व्हावें या करितां, जगत्कल्याणेच्छा सार्वकाल ज्यांचे अंतःकरणांत असून केवळ जगदुद्धारार्थ ज्याचा अवतार त्या श्री जगद्गुरू रामदाससमर्थांच्या आज्ञेनें मी उद्युक्त झालों आहे, यास्तव माझे अंतर्यामी जर केवल परोपकार बुद्धि असेल आणि माझा उद्योग सफल व्हावा असा आपला आशिर्वाद असेल

वर, सांप्रत मजवर आलेल्या विघ्नांचा परिहार व्हावा. [अशी प्रार्थना करून स्तब्ध बसतो आणि पुन:] आई, हे भगवती, तूं सर्वांतः करणीची साक्षीणी आहेस, स्थिरचराची उत्पत्ति, स्थिति आणि लय तुझेच सत्तेने होतात व त्यांस सुख दुःख दाती तूच आहेस हे जर सत्य आहे तर त्या स्थावर जंगमांत मी नाहीं असें नाहीं, तर आहेच यास्तव या विघ्ना पासून माझे रक्षण होईल म्हणून मला प्रसाद मिळावा आणि जर तो न मिळाला तर, मला यवनानी धरून नेऊन कारागृहांत यातना भोगवाव्या आणि त्या स्थितींत मी आपले आयुष्य व्यय करावा त्या पेक्षां येथें तुझें सन्मुख आतांच शिरकमल तुझ्या पायीं अर्पावें हें चांगलें ( असें म्हणून तलवार सरसाऊन अंजुलीपुट पुढें करून नेत्र झांकून बसतो. इतक्यांत 'जय जय' असा ध्वनी होऊन देव्हारांतील चंपक पुष्प त्याचे अंजुलींत पडतें. तें पडतांच डोळे उघडून तें पुष्प वंदितो. )

**जिजाबाई.**— बाळा, शिवबा, तूं चिरंजीव, तुला सर्व सुखें मिळोत आणि ईश्वरीं तुझी अशीच सतत भक्ती राहून प्राणिमात्राच्या प्रीतीस तूं पात्र हो.

**शिवाजी.**— ( आईस नमून ) आई, मी आपल्या जीवित्वास मुकेलों नाहीं, व माझी दुसरी इच्छाही नाहीं माझे हातून देशबांधवांस सुख होऊन गोब्राम्हणाचा प्रतिपाळ व्हावा इतकीच इच्छा आहे ती तुमच्या आशिर्वादाने सिद्धिस जावो. म्हणजे मी जन्मास आल्याचें सार्थक झालें.

( या प्रमाणें बोलत आहेत तों मध्यरात्र झाली आहे इतक्यांत जगद्गुरु रामदास स्वामी देव घरांत प्रकट होतात.)

**रामदास.**– " सदाचक्रवाकासिमार्तंडजैसा,
उडीघालितोसंकटींस्वामितैसा ॥
हरीभक्तिचाघावगाजेनिशाणीं ॥
नुपेक्षीकदारामदासाभिमानी ॥१॥" जयजय
रघुवीर समर्थ.

**शिवाजी.**– [ हात जोडून ] हे सर्वसाक्षजगद्गुरो, हा सेवक चरणीं दंडवत आहे [चरणां मिठी घालितो.]

**रामदास.**–बापा शिवाजी, सार्वकाल तुझी बुद्धि सत्व. गुणी राहो. गोब्राह्मण प्रतिपालनेच्छा अंतरीं वसो आणि श्रीरघुवीर तुला सत्कर्मी यश देवो. (शिवाजीचा हात धरून उठवितात आणि आलिंगन देऊन आसनावर बसवितात)

**जिजाबाई**– [ पायांवर डोई ठेऊन ] गुरुमाहाराजांनी सद्बुद्धी द्यावी आणि बाळा शिवबास सुखी राखावें.

**रामदास.**–श्रीरघुवीर इच्छा पूर्ण करो.

**सईबाई.**–ही सई चरणीं दंडवत आहे. माहाराजांनी कृपा करून हिचें सौभाग्य रक्षावें.

**रामदास.**–मुली, तुह्मी उभयतां सुखें नांदा आणि आपल्या प्रजांच्या हितासाठीं श्रम करा म्हणजे मनोरथ पूर्ण होऊन परलोकीं श्रीरघुपती तुह्मांस आनंदांत ठेवील.

**शिवाजी.**–स्वामीनी या समयीं आगमन केलें त्या योगें मी कृतार्थ झालों. आतां आशा राहिली नाहीं. (असें ह्मणत असतां नेत्रीं प्रेमाश्रू येतात.)

**रामदास.**–(शिवाजीचा हात धरून) शिवबा, हें तूं काय ह्मणतोस? तुझें कर्तव्य पूर्ण झालें काय?

**शिवाजी.**–महाराज, पूर्ण झालें ह्मणून आशा राहिली नाहीं असें नाहीं, परंतु उदईक मजवर भयंकर प्रसंग

येणार त्यांत प्राणहानी झाल्यास, महाराजाचें दर्शन झालें नाहीं असें मनांत राहतें, ती इच्छा दर्शनानें पूर्ण झाली इतकेंच ह्मणतों.

**रामदास.**–अरे शिवबा, मी तुझ्या बोलण्याचा अभिप्राय समजत नाहीं कीं काय? बापा, तूं पहाकीं, तुझे हातून यवनाचा पराभव होऊन या देशांत महाराष्ट्र राज्याची गादी स्थापन होणार हा योग, सांप्रतच्या यवनांप्रमाणें सहस्रश: यवन तुझ्या नाशाकरितां प्रवृत्त झाले तरी चुकेल कीं काय? तूं किंचितही काळजी वाळगूं नको. [ मस्तकावर अभय हस्त ठेवितो. ]

**शिवाजी.**–( हात जोडून ) अपराधाची क्षमा असावी आपली आज्ञा शिरसामान्य आहे. आपलें अभयवचन आहे तर मी प्रत्यक्ष कालालाही भिणार नाहीं महाराज! (पूजा करितो.)

**रामदास.**–बरें, शिवबा आतां रात्र फार झाली आहे यास्तव मी जातों. तूं परवांचे दिवशीं परिवारासह श्रीचे प्रसादास सकुटुंब चाफळास यावें. (असें सांगून)

" समर्थाचियासेवकावक्रपाहे,
"असासर्वभूमंडळींकोणआहे! ॥

( हा श्लोक म्हणत गुप्त होतात. सईबाई शिवाजीच्या पायांचें तीर्थ घेते आणि फळाहार करण्यास सर्वनिघून जातात.)

## प्रवेश २ रा.

स्थळ.–पारगांव ( जंगलांतील तळ. )

**पात्रें–अफझलखान, सैयद, जाफरखान, व हुजऱ्या.**

[ सर्वत्र बैठकीवर बसले आहेत तों. ]

**झाफर.**–(अफझलखानास) आजि सरकार, ये मुल्कमें जंगल इसकदर है के, जो सूरज यहां एकदम आवे तो अपना नूर खो जावें. सिवाह हम जंगलके करीब अपना डेरा दिया है तोभि सेंकडों जनावर छलांग मारते इधरसें उधर और उधरसें इधर जाते आते नजर आतें है, इसप. रसें येह जंगल तमाम जनावरोंसे भरेला मालुम होता. सर. कार उसकी कुछ आपकूं डर है वैसा नहीं, लेकिन इतना सच्च है के, इधरकी सफर कोई कैसाभी जवामर्द होवे तोभी जरा कठण है वैसा केहना जरूर होता. अब ऐसा करना के, अपनी सब पटालना इधर छुपाकर रख थोडे लोगोंकूं साथ लेके दुष्मनके तरफ चलेजाना ऐसा मेरा इरादा है फिर खाविंदकी मर्जी.

**अफझल.**–ओहो! जाफरखांजी. अपने दिलमें उस कम. नसीबके लिये आप दिकदार हो ऐसा मालुम होता. मैं न जानतां हूं के, मेरी आनेकी खबर सुने बाद सिवाजी मेरे रूबरू लढनेका इरादा दिलमें रखेगा! आप क्या जानते हो! बिल्ली चूहेकूं जैसी डराती उसमाफक ये ला. चर मुकल्के लोगोंकूं सिवाजी डराता, लेकिन आदमीके हाथमें लकडी देखतेही जैसी बिल्ली भागके आंधेरमें जाती उसमाफक अपना नाम सुनतेही वो हाथ बांधके माफी मंगगा.

**सैयद.**–हां. सच्च है सरदार, जो अपना नाम पछानता

ची अपनी ताकतभी जानता है. जिनोंका नाम सुनतेही जोरावर दुष्मन कमताकत हो जाते. उनोंके आगे सिवाजी तो रंडी है. चहिये तब जाके उसका हाथ पकड हुजूर ले जाना.

[ इतकें बोलणें होत आहे तों गोपिनाथपंत येतो. ]

**गोपिनाथ** –[सलाम करून] हुकुमाप्रमाणें शिवाजीकडे जाऊन सरकारचा उद्देश त्यास कळविला. माझें बोलणें ऐकून तो आपला फार आभारी झाला आणि आपणापाशीं त्याणें एक विनंती केली आहे कीं,:–

**अफझल.**–[आनंदानें सय्यदास] क्यौं सयदखां, मेरे कहा माफक हुवा या नहीं? मेरी पक्की खात्री है के, ये कमताकत मरेठ लोग! उसका बाप शहाजी मेरा पैछानवाला है.

**सैय्यद.**–सच्च है, क्या सरकारकी पहोंच है? कहा है "अकलमंदकूं सब कुछ सेहल है" (गोपिनाथपंतास) उसका क्या अरज है?

**गोपिनाथ.**–[अफझलखानाकडे वळून] तो असें म्हणतो कीं, खानसाहेबांचें म्हणणें मी मान्य करितों, परंतु ज्यापेक्षां स्वारी पारगांवपर्यंत आली आहे त्यापेक्षां येथपर्यंत येण्याची तसदी घेऊन मला भेटीचा लाभ द्यावा.

**अफझल.**–क्या फिकर है! अपनी फौज साथ लेके वहां जाना और अपनी मसलहत पूरी कर लेना.

**गोपिनाथ.**–छेः छेः सरकार, फौज बरोबर नेण्याचें कांहीं कारण आहे असें मुळींच वाटत नाहीं, कारण तो फार भित्रा आहे. त्यास आपण पाहिल्यावर सहज खात्री होईल. मला असें वाटतें कीं; आपली फौज प्रतापगडाखालील तळांत तयार ठेऊन बरोबर एक विश्वासू मनुष्य घे-

ऊन किल्ल्याच्या रस्त्यांत मध्यभागीं एक तयार केलेली जागा आहे तेथें आपण जावें, त्याचप्रमाणें त्याणेंही एक हुजऱ्यानिशीं भेटीस तेथें येण्याचें मी सांगितल्यावरून कबूल केलें आहे. आपण जातेवेळीं एक पिस्तोल भरून बरोबर न्यावें. शिवाजीस भेटतेवेळीं आपण त्यास पोटाशीं दाबून धरून सूचनेकरितां पिस्तोलाचा आवाज करावा म्हणजे फौज वर चढून येईल. ती आल्यावर शिवाजीस कैद करून त्याच्याशीं बोलणें करावें आणि मग धरून नेणें किंवा क्षमा करून सोडून देणें हा विचार आपल्या मर्जीवर आहे. हा माझा विचार मी सरकारास विदित केला. सरकारची मर्जी असल्यास मी बरोबर येईन.

**अफझल०.**–(मान डोलवून) बहोत अच्छा, बहोत अच्छा, [सैयदास] क्यौं सय्यद, कैसी पंडतकी मसलहत है! कहा है "कांटोसें कांटा निकलता" उसमाफक मरेठेने मरठकू फसाया. बहोत खुब! हम येहि मसलहतकूं राजी. जिस्में अपनी मसलहत बहुत अच्छी बन जाती. [गोपिनाथास] अजि पंडत, तुमारी इन्तेजारी पातषहाकूं खबरू जाहिर कर के तुमारा तनखा खुब बढा दुंगा. फिर तुम खुषी हो या नहीं?

**गोपिनाथ**–गरीबाचें हित करणार सरकार समर्थ आहेत. कल्याण करावें असें जर मनांत आणतील तर एक पळही लागणार नाहीं; पण मी विनंती करितों कीं; मी जें कांहीं केलें यांत विशेष असें कांहीं नाहीं. आपणासारख्या धन्याचें हित करावें हा आम्हासारख्या नौकराचा धर्मच होय.

**अफझल०**–[जाफरखानास] क्यौं? पंडतकी मसलहत सतंप होगई या नहीं?

**जाफर.**– पसंत क्यौं न होगी! अलबत होगी. कल दो पहरके वख्त सैयदखांकूं साथ लेके उधर जाना. मै नीचे पटालनका बंदोबस्त रखूंगा.

**अफझल०.**–पंडत, "तुम्हारे कहामाफक कल दो पहरके वख्त आउंगा और तुमभी उस वख्त वहां हजर रेहेना" ऐसा लिखके वो खत सिवाझीके तरफ भेज देना और कल तुमभी हमारे साथ आना.

**गोपिनाथ**– फार चांगलें आहे. आज्ञे प्रमाणें करितों.

( असें म्हणून शिवाजीकडे पत्र स्वारां बरोबर रवाना करितो. )

---

## प्रवेश ३ रा

पात्रें.

**शिवाजी, जिजाबाई, आणि सईबाई.**

स्थळ.– प्रतापगड.– ( राज महाल )

( शिवाजी अफझलखानाच्या भेटीस जाण्याची तयारी करून निघतो . )

**शिवाजी.**– [ मातोश्रीस वंदून ] आई, मी काल आपणापाशीं बोलल्या प्रमाणें त्या विजापूरकरांच्या सरदाराच्या भेटीस जात आहे. आपण कांहीं काळजी न बाळगितां मला जाण्याचा निरोप द्यावा.

**आई.**– बाळा शिवबा, शतायुषी हो आणि तुला सर्व सुखें अनुकूल होवोत .बेटा शिवाजी, तूं धूर्त आहेस, चपळ आहेस आणि स्वामीची व जगदंबेची तुजवर पूर्णकृपाहि आहे तेव्हां तुला जय प्राप्त होईल यांत संदेह नाहीं, तरि मी सांगतें तें तूं ध्यानांत ठेव. काय म्हणशील तर हेंच

कीं, तुला पाठबळ नाहीं, तुझा स्वभाव थोडासा हट्टी आहे, भरीं भरून कदाचित प्राणावर प्रसंग येईल म्हणून सांगतें, आपणास संभाळून जें करणें तें कर बरें ! [डोळे पुसून] ते मुसलमान निर्दय, बळकट व कपटी आहेत यास्तव माझा जीव काळजी करीत आहे! आतां फार सांगत नाहीं, ये बरें!

**शिवाजी.**– आई, काय वेड हें ! गुरुमाहाराजांची पूर्ण कृपा असल्यावर काळजी कशाची ? कदाचित अपयश आल्यास स्वधर्मरक्षणाकरितां व देश कल्याणा करितां प्राण खर्च केला अशी जगांत कीर्ति होईल.

**आई.**–नकोरे बाळा! असें वाईट शब्द बोलूं नको ! परोपकारा करितां तुझा यत्न आहे त्या अर्थीं श्री राम तुला यश देईल. ये आतां. माझा तुला आशिर्वाद आहे.

( शिवाजी महालांत येतो तों सईबाई धांवून गळयांस मिठी मारते. )

**शिवाजी.**– मला आज्ञा पाहिजे, निरोप आहे ना?

**सई.**– [ सद्गद होऊन ] मी नाहीं म्हणून माझें कोण आईकणार ! आणि सर्व तयारी झाल्यावर नाहीं तरी कोणी म्हणावें; पण पांयापाशीं इतकी विनंती आहे कीं. हे पाय पाहिल्या शिवाय माझा जीवः– ( गहिवर येऊन कंठ दाटतो व पुढें बोलवत नाहीं. )

**शिवाजी.**– ( डावा हात खांद्यावर टाकून वेणी धरून तिचे मुखचुंबितो आणि म्हणतो. ) काय हा प्रकार! हा शोक पाहून माझें धैर्य खचतें. जिवलगे तूं अशी चिंता कां करतेस ! आम्ही शिपायी आहों. मुसलमान बलाढ्य म्हणून जरी लौकीक आहे तरी मला त्यांची फारशी पर्वा वाटत नाहीं.

**सई.**— हो! परवा वाटत नाहीं! आज तीन दिवस निद्रा तरी आहे का? काळजीनं डोळे कसे ओढून गेले आहेत. उगच मला सांगायचं मात्र; असें करूं आणि तसें करूं! मी आपणाला सांगतें, माझ्या गळ्याची शपथ आपण जाऊं नका. चिमा, यमनी, चंद्र भागा ह्या, त्या मेल्या मुसलमानांची एक एक भयंकर गोष्ट सांगतात ती ऐकून माझ्या आंगाचं पाणी मरतें आणि आंगावर काठा उभा राहातो, मेलें कालरूपी धटिंगण यम ते,

**शि०.**— पुन:तेंच तेंच!! लढाई मध्येंका जावयाचें आहे? रस्त्याच्या मध्यभागावर जाऊन त्याची भेट घ्यावयाची आणि परत यावयाचें, तेथें वेळाचा विचार कशाला पाहिजे. द्या आतां एकदां परवानगी.

**सई.**— भेट घ्यावयाची असो अगर लढाई करावयाची असो; मी जें सांगितलें तें सांगितलें. या उपर जाणें तर मग मर्जी.

**शि०.**— काल आपण काय कबूल केलें होतें त्याची आठवण आहे का? मग ही शपथ कशाला, वेड सगळें!

**सई.**— काय मीं काल कबूल केलें होतें!

**शि०.**— सद्गुरू रामदास, अंबाबाई आणि आई यांची आज्ञा झाल्यास मजकडून हरकत नाहीं असें आपण नाहीं का काल म्हणाला आणि आज असें म्हणतां हा चमत्कार नव्हे का!

**सई.**— ( कुंठित होऊन ) काल मीं म्हटलें होतें, पण आतां आइयानें तसें म्हणवत नाहीं, माझें मन आज वेडं झालं आहे.

**शि०.**— ठीक! म्हण आहे, "राजाची निघाली स्वारी

आणि मशालजी म्हणतो माझा घातवार " तसें हें तुमचें मन! भेटीची तयारी केली काय, त्यांचा आमचा संकेत ठर· ला काय आणि तुम्ही शपथ घालता हें काय, ती शपत परत घ्या.

**सई.**– मी नाहीं घेणार, जायचं तर जावं, मात्र माझी आशा धरूं नये. जाण्यास मजकडून हरकत नाही. [रूसूनबसते.]

**शि०.**– [ जवळ जाऊन तिला आलिंगितो ] प्रिये, हे काय बरें हें! या प्रसंगी जर तूं अशी अट घेशील तर या- चा परिणाम काय होईल! लोकांत अपकीर्ती होऊन आपला नाश होणार नाहीं काय ? या वेळीं तुझें मन मोडून जाणें मला प्रशस्त वाटत नाहीं, या साठीं विचार करून जाण्या· ची परवानगी दे. नियमित वेळीं तेथें गेलें पाहिजे.

**सई.**– ( निरूपाय होऊन आलिंगिते ) माझ्यानें जा असें ह्मणवत नाहीं, पण काय करूं प्रसंग या प्रकारचा आहे म्हणून डोळे मिटून ह्मणते कीं, मी शपथ परत घेतें, पण या बटिकीचें स्मरण असून, सासू बाईनी मघां सांगि· तलेलें ध्यानांत असुद्या. माझा जीव आपणा कडे लागला आहे हें मी वारंवार सांगत नाहीं ( गहिवरते. )

**शि०.**– चिंता करण्याची गरज नाहीं, हा मी भेटून आलोंच समज. [ तिचें चुंबन घेतों ] पण आतां मनांत किं तूं नाहीं ना?

**सई.**– [ प्रेमानें ) किंतू कशाचा, मेला जीव वेडा म्हणून तळमळ करितो !

**शि०.**– बरें मी आतां येतों तर. [ असें म्हणून चौकांत येतो आणि तानाजी मालूसरा हत्यार बंद तयार होताच त्यास बरोबर घेऊन खालीं येण्यास निघतो.]

---

## प्रवेश ४ था

स्थळ—संकेतस्थळ.

( आपलें सैन्य किल्याखालीं ठेऊन गोपिनाथपंत व सैयद, या उभयतांस बरोबर घेऊन अफझलखान संकेतस्थळीं येऊन.)

**अफझल.**—( गोपिनाथपंतास ) क्यौंजी पंडत, इधर आके इतना देर होगया तोभी दुष्मन सिवाझी अबतख क्यौं न आता? कुच दंगा फिसाद तो नही ?

**गोपिनाथ.**—( सलाम करून ) हो, वेळ तर होत आली. तो आतां येईल सरकार. ( वर किल्याकडे पाहून ) तो पहा आपल्या भयानें हळू हळू खालीं येत आहे. सरकार, दंगा फिसाद त्या यःकश्चित मनुष्याचे हातून काय होणार?

**अफझल.**—( वर न्याहाळून पाहातो ) हां, दो आदमी उपरसें आतें है वैसा मालुम होता सच्च. ( इतक्यांत शिवाजी बराच जवळ आला असें पाहून )

**अफझल.**—( हातांतील पिस्तोल, इजार वगैरे सांवरून मागेंपुढें येतो जातो आणि गोपिनाथपंतास ) पंडत, तुम आगे जाव और सिवाझीकूं आदबीसें इधर ले आव.

**गोपिनाथ.** [ शिवाजीकडे जाऊन ] महाराज, आपणास नेण्या करितां मला सामोरा पाठविलें आहे.

**शिवाजी.**—( हळूच ) गोपिनाथपंत, अफझलखानाच्या शेजारीं जो हत्यारबंद शिपायी आहे तो हर कोणत्या तरी रीतीनें दूर अंतरावर जाई अशी तजवीज व्हावी. [ असें म्हणून दबकत चालतो ]

**गोपिनाथ.**—( अफझल खानाजवळ येऊन ) सरकार. आपके पास सैयद हत्यारबंद है उसकू वो डरताहै वास्ते सैय्यदकूं एकतरफ खडा रेहेनेका हुकूम करना चाहिये.

**अफझल.**– [ सैयदास लांब उभें राहण्यास सांगून गोपि- नाथ पंतास ] तुं जाके सिवाझीकूं केहना के, डरना नहीं, तूं हमारा दोस्त है. दोनो एक जगे मिलके दो बातां करके दिल रमाना ये मेरा इरादा हैं.

**गोपिनाथ.**– [ शिवाजीस तें सांगून ] असें खानसाहेब म्हणतात.

[ शिवाजी जवळ येतो त्यास अफझलखान आलिंगितो )

**अफझल.**– आहो ! दोस्त शिवाजी, तुं तो बहुत रोजसें मिला, तुझकूं देखतेही दिल खुष हुवा.

**शिवाजी.**– खरेंच आहे तें, मनांतील गोष्ट सिद्धीस गेल्यावर मग आनंद कां होणार नाहीं! आपणा सारख्या थोर पुरुषांची ही रीतच आहे.

**अफझल.**– क्यौं यार, तुझे मुसलमीनोंकी जुबान नहीं मालुम, मुझे मरेठोंकी जुबान बराबर नहीं मालुम होती. (असें बोलत असतां शिवाजीस आपल्या उराशीं दाबून धरतो )

**शिवाजी.**– अफझलखांजी, ये क्या करते हो? मिलते हो या मेरा जान लेते हो? ये कुछ मिलनेकी तौर नहीं !! कैसे दबाते हो ? ( हातांतील वागनखें सरसावतो )

**अफझल.**– ( क्रोधानें ) दुष्मन सिवाझी, तूं अपने दिलमें क्या समजता ? आजदीन तक तूंने सरकारकूं बहोत तसदी देदियी है, अब छोडदे अपने जीकी आसा. ( पिस्तोलाचा आवाज करितो )

**शिवाजी.**–अरे मगरूर, मैभी येहि कहतांहूं ! तेरा जान अब नहीं बचेगा, अब कर खुदाकी याद ( असें म्हणून पोटांत वागनखें खुपसून आंतडीं बाहेर काढित आहे इतक्यांत शिवाजीवर अफझलखान तलवारीचा वार करितो, पण चिल-

खतामुळें लागू होत नाहीं. इतक्यांत बिचवा काढून शिवाजी त्यास ठार मारतो.)

**सैयद.**—[ धन्याची स्थिती पाहून शिवाजीवर धांवून येतो ] अरे बे इमान, मिलनेका बहाना दिखाके सरदारका जान लिया, ऑ! अब देखले, ये समसेरसें तेरी मुंडी जमीनपर ला देताहू ( इतकें बोलून वार करणार तों शिवाजीनें त्याचे हातची तलवार घेतली आणि म्हणाला )

**शिवाजी.**— अरे भले आदमी, अब क्यौं मौफत मरजाता! जा. तुझ तेरा जान बक्षीकिया.

**सैयद.**— अरे मरेठे, दुष्मन, निमक हराम, मेरे खांविंद. सें मेरा जान मुझे ज्यादा नहीं, जिन्ने आज तख मुझे फर्जंदके माफक बढाया. उसके साथ मरना मुझ हक्क है. [ असें बोलून तानाजी व शिवाजी यांवर चालून येतो, पण त्यास उभयतां मारतात. संकेता प्रमाणें जावळींतील फौज तळावर छापा घालिते. व प्रतापगड व वरून आलेले लोक अफझलखानाचें शिर कापून शिवाजीसह हरहर म्हणत किल्यावर जातात.]

---

## प्रवेश ९ वा.

स्थळ—प्रतापगड. ( कचेरी )

पात्रें.

**शिवाजी, तानाजी, मोरोपंत, खंडेराव, भूखन, इतर मानकरी, अफझलखानाची स्त्री** आणि **मुलगा.**

[ कचेरी बसली आहे व त्यांत जयाच्या गोष्टी चालल्या आहेत. ]

**भूषन.**—सरकारकूं वडी तसदी खैंचने पडी, लेकिन महाराजा जगद्गुरुके, कृपादृष्टीसें भला हो गया.

**शिवाजी.**—अहो कविराज, जय झाला हें जरी खरें आहे तरी अफझलखानास मारावें असा माझा उद्देश नव्हता. जर त्याणें मजशीं कपट राखिलें नसतें, तर चार मरीवीच्या गोष्टी बोलून कांहीं आपलें व कांहीं त्याचें कल्याण व्हावें असेंच मी इच्छित होतों. अनेक प्राणी प्राणास मुकून पृथ्वीवर रक्तश्राव व्हावा हे फार वाईट; परंतु निरुपायामुळें तसे करणें प्राप्त झालें. मला या मुसलमानाचा बेइमानी स्वभाव माहीत होता व हें मी समजत होतों कीं, जरी आपण निःकपट वर्तलों तरी हा मला कैद करून नेण्यास किंवा तें नसाधे तर ठार मारण्यास कमी करणार नाहीं, भेटतेवेळीं त्याणें जी मला मिठी मारिली ती इतक्या जोरानें कीं, त्या योगें माझा श्वासोश्वास बंद झाला, नंतर पिस्तोलाचा आवाज केल्याबरोबर मी दगा आहे असें समजून स्वतांचा बचाव करण्याचें योजिलें. असो त्याबद्दल श्री रघुवीरानें मला क्षमा करावी.

**मोरोपंत.**—सरकारचें म्हणणें कीं, रक्तश्रा न व्हावा परंतु, आपणा सारख्यांच्या हातून जर या चांडाळांचा नाश न होईल तर देशास सुख कसें व्हावें. याजकरितां जें झालें तें उत्तम झालें. मी असें ऐकिलें कीं, आज तानाजीनी सरकारास पुष्कळ मदत केली.

**तानाजी.**—कशाची मदत न कशाचं काय! समदा सरकारच्या पायांचा परताप. आमची व काय सक्ती?

**शिवाजी.**—शाबास. तानाजी सारखे व आपल्या इतर सर्व सरदारांसारखे धैर्यवान पुरुष जर सार्वकाळ जवळ अ-

सतील तर मला वाटतें कीं; मी औरंगझेबासही भिणार नाहीं.

[ हें बोलत आहेत तों खंडेराव कांकडे, अफझलखानाच्या स्त्रीस व मुलास घेऊन येतो ]

**खंडेराव.**–राम राम सरकार, अफझलखानाच्या तळांत एक बायको व एक मुलगा सांपडला आहे. हीं दोघें माय लेकरें रडत तेथें पडलीं होतीं, त्यांस महाराजांपाशीं हजर केलीं आहेत. त्यांस कचेरींत आणणें रीती विरुद्ध ह्मणून बाहेर उभीं ठेविलीं आहेत. पुढें माहाराज आज्ञा करितील तसें.

**शिवाजी.**–(विचार केल्यासारखें करून) खंडेराव, त्या उभयतांस त्या समूरच्या पडद्या आड बसवा.

**खंडेराव.**–ठीक आहे महाराज, [पडद्याचे आड बसवितो. तेथें मायलेकराचें संवाद होतात ते सर्व कान देऊन ऐकतात.)

**मुलगा.**–मां, मुझे ये अंधारेमें क्यौं लेकर बैठी? बाबाके तरफ मुझे पहुचाव. उसके पास जाके मै खुराक खाऊंगा. चल उठ, मुझे उधर ले जाव. कल रातकूं बावाने मुझे कहाथा के, तुझे जरकी टोपी और मिठी खुराक दिला दूंगा करके.

**अ. स्त्री०.**–(गाहिंवरून) बेटा! ! ! (श्वासोच्छ्वास टाकून) बेटा, रोना नहीं! रोना नहीं. बच्चा, तेरा बाप:–

**मुलगा.**–हां, उसके तरफ मुझे ले चलो.

**अ. स्त्री०**–बेटा, जोरसें मत पुकार, फिलहाल खुदाताlलानें अपने तरफ बाकी नझर किई है, उससें यह बुरे हालतमें हम दोनो गिरफतार हूं. चुपी बैठजा. मुसें बात नकर

मेरा प्यारा, तेरा बावा अब कहांसें नझर आवेगा. [रडतें]

(हें ऐकून शिवाजीचें अंत:करण खिन्न होतें.)

**मुलगा.**–क्या तूं कहती? मुझे यहां छोडके बावा अपने सेहरको निकल गया? नहीं, तूं मुझे ठगानेकेलिये कहती. मुझे छोडके कभी न जावेगा. सबेरे रोटी खाये बाद मैं बावा के छपरखाटपर सो रहथा, तब बावाने मुझे उठाके बोला, मेरा दिलजान, तुं इधर सो जाव. मैं आते बखत तुझे कुछ अच्छी चीज लेकर आऊंगा. और तुं कहती, के अब कहांसें नझर आवेगा!

**अ. स्त्री.**–[त्याचे तोंडावर हात देऊन] अरे दुष्मन जोरसें बोलो मत. कोई सुने तो दोनोंकूं हक मरना पडेगा. बेटा,केहना सुन.(आपल्याशीं) ऐ खुदा,ऐ परवरदिगार, क्या हमारी हालत! मै ऐसी बियाबानमें रहती थी के, आज तख मेरे दिलजान प्यारे सिवाह किसकी नझर मुझे देखने न सकी. अब मुझे न खाविंद या न कोई मदत गार. ये नादन बेटेकी अपने नझरआग क्या हवाल होगी! खुदा, तुं मेहेर करके पहिले मुझे मौतदे. फिर जो तुझे मंजूर सोकरले!

[ हें तिचें बोलणें ऐकून शिवाजीचे डोळे पाण्यानें भरून येऊन तिला म्हणतो. ]

**शि०.**– अजी बेहेन, रोना मत, मेरा केहना सुनलेना.

**अ. स्त्री.**–(चपापून हळू ह्मणते.) मुझें कमनसीबकूं बेहन कौन कहता हैं?

**शि०.**– ये सिवाझी है. जिन्ने आपको ये हालतमें डालदिया है सो.

**अ. स्त्री.**– [ विचार केल्या सारखें करून ] अलहमदुल्लिला! राजा सिवाझी, मैं न जानती थी के, तुमारा कलेज

इतना कठन है ! अजीराजा, मेरी औरतकी जात. आपके साथ बातां करना मुझे ना लायक, लेकिन करती हूं, क्योंके, मुझे अब जानकी आसा नही है. अजि महाराजा, मेरे खाविंदकुं दुनियांमेंसे तूने उठाया !! ( रडते. )

शि०.— बेहन, इसमें मेरा कुछ बाक नहीं, मेरा इरादा, खांनसाबके पास दो बातां करके दोस्तीसें रेहनेका था, लेकीन जब मुझे दबाकर मेरा जी लेनेकूं तयार हुवे तब अपना हथियार उठानेकी जरूर पडी. आच्छा जो होग. या सोबनगया, लेकिन उसकी मुझकूं माफी करके, अपना दिल खुलास रखना, जो कुछ चीज चहिये सो मैं हजर कर दूंगा. कहा है ' जो बात बनगई उसका विचार करना मौफत है' उसमाफक मेरा कहना सुनके, चाहिये तो इधर या चहिये तो बिजापूरमें या दिल चाहे बहां रेहना.

अ. स्त्री— [ आपल्याशीं. ] क्या भला आदमी है !! अपना मर्द हुवा तो क्या हुवा, खुदा बडा इन्साफी हैं. ' जैसा करना वेसा पाना ' ( उघड ) अब जियादा बोलके कुछ फायदा नहीं, लेकिन अपने कदमके पास मेरा एक अरज है.

शि०.— ये क्या कहते हो ! जो कुछ केहना होवे सो बेलाशक केहना, मैं पुरा कर दूंगा.

अ. स्त्री.— अरज यह है के, मेरा बेटा वहुत छोटा है. अब तख न अकिल या न कूत कमानेकी ताकत. उसको बाप नहीं है, इसलिये उसके बापके जगे आप होके इनको तनदुरुस्ती रखना. इसमें खुदा राजी होके, तुमारा भला करेगा. और जिस हत्यारसें खाविंदकूं मारडाला येहि हत्यारसें मुझें उनके तरफ पहुचाना. दिलजान बिना दुनियामें रे-

हना मुझे मंजूर नहीं. मेरे मा बाप, इतना अरज सुन लेना!

शि० (गहिंवरून) आप ऐसा मत कहो, क्यौ के, जमी, अस्मान और पातालमें जीके बराबर कीमतकी दुसरी चीज नहीं है. वास्ते अपना इरादा मौकूफ करना. मै तुमारे बेटेका अच्छे तऱ्हेसे बंदोबस्त रखूंगा.

**अ. स्त्री.**– भाई सिवाजी, मैं जानती हूं के, जान मौफत गमाना ना लायक है, लेकिन बारोबार याद होके दिल बिघड जाता है. [क्षणभर उगीराहून] अच्छा तुमारा दिल हम बिघडनेकूं नहीं सकती, लेकिन बिजापूरके तरफ ये मूं लेके जानेकूं मैं बडी ना खुष हूं, वास्ते ये मुल्कमें जिधर चाहे उधर रखना.

**शि०.**–बहुत अच्छा, मै सबकुछ तजवीज किई हैं, (खंडेरावास) खंडेराव, या उभयतां मायलेकरांस तुम्ही चांगल्या प्रकारें सांभाळावें व त्यांस जें पाहिजे तें पुरवें [मोरोपंतापाशीं हळू) कायहो पंत, ही विजापुरीं जाण्याविषयीं नाखुषी दाखविते याचें कारण इतकेंच कीं, मीं विजापुरीं जाण्याची नाखुषी दाखविली ह्मणजे मागें पुढें तिकडे पळून जाईन याची शंका यांच्या मनांत येणार नाहीं; असा तिचा बेत; परंतु मला असें वांटतें कीं, तिच्या ह्मणण्या प्रमाणेच करावें. कदाचित पळून गेली तर मोठेंसें नुकसान नाहीं.

**मोरोपंत.**– हो हो, त्यांत नुकसानतें काय होणार! परंतु तूर्त तिचें बोलणें मान्य करून जी व्यवस्था महाराजांनी केली ती उत्तमच आहे. असो, आपल्या सरदारमंडळीस श्रमझाले आहेत यास्तव त्यांस आपआपल्या स्थळीं जाण्याची आज्ञा व्हावी,

**शि०.**– हो. खरेंच, त्यांस आपल्या तळांत जाण्याची

आज्ञा करावी आणि उदईक रीती प्रमाणें बक्षिसें द्यावयाचीं त्यांहून कांहीं जास्त द्यावीं, कारण आपणास या लढाईंत बराच फायदा झाला आहे. जे घोडे मिळाले आहेत त्यां पैकीं आपल्या सरदारास, ज्यांस जो पसंत होईल तो द्यावा. सारांश ज्या प्रकारें आपली मंडळी खुष होईल तसें करावें. विशेष सांगत नाहीं. आतां मातेच्या भेटीस जातों. [ असें म्हणून वाड्यांत निघून जातो. ]

( खंडेराव, त्या उभयतास घेऊन जातात व मोरोपंत जावळीस जातात आणि सांगितल्या प्रमाणें व्यवस्था झाल्यावर फौजेंतील सर्व लोकांस वेळ मिळेल तेव्हां श्री रघुपतीचें भजन करण्या विषयींचा हुकूम होतो. )

[ सर्व निघून जातात. ]

समाप्त.

टीप.—भुखन कविनें फौजेंतलि लोकांस तीन रात्री केलेल्या उपदेशाचा निबंध, ज्यांत शिवाजीच्या देशकल्याणे च्छेला उद्देशून भाषण आहे असा हिंदुस्थानी भाषेंत असलेला आम्हांस मिळाला आहे, तो आश्रय मिळाल्यास सवडीनें प्रसिद्ध करण्यांत येईल.

## या पुस्तकास ज्यांणी आपला उदार आश्रय दिला

## त्यांचीं नावें.

### ठाणें.

प्रती- नावें.

१० रा. रा. हरी नारायण ठाकूर.
१० रा. रा. येशवंत विनायक खारकर.
१० रा. रा. हरी शिवराम श्रृंगारपुरे.
५ रा. रा. माधवराव कृष्ण खारकर.
२ मे० कुवरजी कावसजी. फु. मा.
२ रा. रा. जनार्दन महादेव ओक.
२ रा. रा. रघुनाथ भिकाजी देसाई.
२ रा. रा. कृष्णाजी हरी आपटे.
२ मे० सेख दाउद गवास महंमद.
१ रा. रा. लक्ष्मण यादव असखेडकर, बी-ए.
१ रा. रा. वासुदेव गणेश जयवंत.
१ रा. रा. बळवंत राव वामन.
१ रा. रा. गोविंद बाबा गुरुजर वकील.
१ रा. रा. केशवराव गोविंद वकील.
१ रा. रा. विनायक बळवंत वकील.
१ रा. रा. रामचंद्र पद्माकर वकील.
१ रा. रा. वामन रामचंद्र ओक, वकील.
१ रा. रा. नारायण अमृत वकील.
१ रा. रा. चिंतामण सदाशिव वकील.
१ रा. रा. विष्णु आपाजी आपटे, वकील.

१ रा. रा. विनायक रामचंद्र गोखले, वकील.
१ रा. रा. चिमणाजी केशव वकील.
१ रा. रा. पर्शुराम विष्णू योगी वकील.
१ रा. रा. रामचंद्र त्रिंबक आचार्य, वकील.
१ रा. रा. बाळाजी विश्वेश्वर साठे.
१ रा. रा. गोविंद जगनाथ गुप्ते.
१ रा. रा. बाळकृष्ण श्रीधर डबीर.
१ रा. रा. बाळकृष्ण शिवराम.
१ रा. रा. विठ्ठल हरी लिमये.
१ रा. रा. बाबाजी हरी कारकून.
१ रा. रा. सिताराम भास्कर.
१ रा. रा. रामचंद्र गोविंद.
१ रा. रा. रामचंद्र पर्शुराम सहस्त्रबुध्ये.
१ रा. रा. बाळकृष्ण विनायक.
१ रा. रा. बाबाजी गोविंदराव.
१ रा. रा. विठल रामचंद्र तांबे.
१ रा. रा. पांडुरंग रामचंद्र.
१ रा. रा. नारो रघुनाथ.
१ रा. रा. प्रभाकर बळवंत.
१ रा. रा. गोपिनाथ जयराम.
१ रा. रा. हरी गोपाळ केतकर.
१ रा. रा. लक्ष्मण जयदेव गोरे.
१ रा. रा. गंगाधर भिकाजी जोशी.
१ रा. रा. विष्णु विठल भास्ये.
१ मे० जमसेज्जी रतनजी नाझर.
१ मे० साम्युअल सुभेदार.

१ मे० साम्युअल याकुबजी हवालदार.
१ मे० आतर सिंग.
१ रा. रा. लक्ष्मण नारायण आघारकर.

## पुणें.

प्रती. नावें

१ रा. रा. गोविंद महादेव केळकर.
१ रा. रा. हरीदास नानाभाई.
२ रा. रा. कृष्णाजी नारायण खेर.
१ रा. रा. लक्ष्मण दाजी जोशी.
१ रा. रा. श्रीधर विनायक आठल्ये.
१ रा. रा. कृष्णाजी सिद्धेश्वर देव.
१ रा. रा. केशव पुरूषोत्तम.
१ रा. रा. बापूजी कृष्णाजी.
१ रा. रा. सिउ उसण्णा.
१ रा. रा. भवानी शंकर राघवनंद.
१ रा. रा. सदाशिव शामराव.
१ मे. रूबेन साम्युअल.
१ मे. राघोबा अंमाजी.
१ रा. रा. नारायण रघुनाथ.
१ रा. रा. नारायण वासुदेव.
१ रा. रा. काशिनाथ केशवजी.
१ रा. रा. काशिनाथ भाऊ.
१ मे. जाकोब बेंजामिन.
१ रा. रा. माधवराव रघुनाथ.
१ मे. एलिशा शालोम.
१ रा. रा. आनंदराव साबाजी.

१ मे. इझिकेल साम्युअल.
१ रा. रा. गजानन आबाजी.
१ रा. रा. गोपिनाथ आत्मारामजी.
१ रा. रा. शिवराम रामचंद्र.
१ रा. रा. सिउ आशण्णा.
१ रा. रा. गणपतगीर रतनगीर.
१ रा. रा. रामराव बाजी क्षीरसागर.
१ रा. रा. विष्णु गणेश साने.
१ रा. रा. गंगाधर विष्णु साठे.
१ रा. रा. केशव सखाराम.
१ रा. रा. महादेव श्रीधर कुळकर्णी.
१ रा. रा. गोविंद बाळकृष्ण कुळकर्णी.

## मुंबई.

प्रती. — नावें

५ रा. रा. नारायण भिकसेट.
१ रा. रा. केशव पुतळाजी.
१ रा. रा. बाबाजी पुरूषोत्तम.
१ रा. रा. भास्कर बचोबा.
१ रा. रा. माधवराव रंगराव.
१ रा. रा. आनंदराव कृष्णराव.
१ रा. रा. श्रीधर लाडको.
१ रा. रा. आत्माराम बापसोबा.
१ रा. रा. शिवराम नारायण गो. इ
१ रा. रा. शिताराम विठोबा.
१ रा. रा. सुंदर रामकृष्ण.

१ रा. रा. बाळकृष्ण नानाजी.
१ रा. रा. लक्ष्मण पुरूषोत्तम.
१ रा. रा. बाबाजी भाई.
१ रा, रा, केशरीनाथ बाळकृष्ण.
१ रा; माधवराव श्रीधर
१ मे० येसिफ इसाजी दि०

## रत्नागिरी.

प्रती. नावें.

१० रा. रा. पर्शुराम भिकाजी भाव्ये.
१ रा. रा. आत्माराम बळवंत.
१ रा. रा. सीताराम विश्राम.
२ रा. रा. श्रीधर नारायण.
१ रा. रा. शिवराम कृष्ण.
१ रा. रा. बाबु विनायक.
१ रा. रा. रामचंद्र विठोबा.
१ रा. रा. कृष्णाजी नारायण.
१ रा. रा. यज्ञेश्वर आबाजी देशमुख.
१ रा. रा. नारायण मोरेश्वर.
१ रा. रा. माहादेव रावजी.
१ रा. रा. अनंत बाळकृष्ण.
१ रा. रा. कृष्णाजी नारायण.
१ रा. रा. शिवराम रामचंद्र.
१ रा. रा. भिकाजी रामचंद्र.
१ रा. रा. त्रिंबक माधवराव.
५ रा. रा. रामचंद्र अमृत दुगल.

## वेंगुर्ला.

प्रती. नांवें.

१ रा. रा. विसाजी नारायण.
२ रा. रा. बळवंतराव भास्कर.
१ रा. रा. सीताराम पर्शुराम.
२ रा. रा. विठ्ठल गोविंद.
२ रा. रा. येशवंत नारायण.
१ रा. रा. पुरूषोतम लक्ष्मण.
१ रा. रा. मोरो गोपाळ वकील.
१ रा. रा. अंताजी रामचंद्र.
२ रा. रा. रामचंद्र महादेव.
१ रा. रा. रघुनाथ लक्ष्मण.

## पेण.

प्रती. नांवें.

५ रा. रा. विनायक रामचंद्र कर्णकर.
५ रा. रा. आपाजी गणेश.
२ रा. रा. रामचंद्र दाजी.
१ रा. रा. केशव गोविंद.
१ रा. रा. गणेश सखाराम.
१ रा. रा. विष्णु सखाराम.
१ रा. रा. कृष्णाजी महादेव.

## वसई.

प्रती. नांवें.

२ रा. रा. सखाराम गोविंद.
१ रा. रा. गणेश रामचंद्र.
१ रा. रा. जगजीवन काशीदास.

१ रा. रा, दामोदर किसनदास वकील.

**मालवण.**

प्रती. नांवें.

१० रा० रा० सिताराम रघुनाथ देसाई.

१ रा० रा० भगवान रामचंद्र.

२ रा० रा० बळवंतराव हरबाजी.

१ रा० रा० नारायण माणे कंत्राक्टर, मु, महाबळेश्वर.

**अकोलनेर, जि० नगर.**

प्रती० नांवं०

३ श्री० मोरोकृष्ण दाभोळकर

१ रा० रा० धोंडो केशव खाडिलकर.

१ रा० रा० नारो विठ्ठल पंडित.

५ रा० रा० नारायण अनंत डे० का. अहंमदनगर

१ मे० बालकिसन अमरसिंघ. कल्याण

शहापूर, जि० ठाणें

१० रा० रा० रघुनाथ गोविंद कंत्राक्टर.

१ रा० रा० बाळाजी विश्वनाथ. दिवेकर.

१ रा० रा० नेटिव लायब्ररी. संदती, बेळगाव

१७ रा० रा० कृष्णाजी रामचंद्र डे. पास्टमा. बेळगाव

**भिवंडी.**

१ रा० रा० केशव अमृत बेंद्रे.

१ रा० रा० केशव रामचंद्र.

१ रा० रा० माधवराव रघुनाथ.

१ रा० रा० गोविंद बापूजी. टेंगोडे जि० खानदेश.

---